नागपूर मुख्य कार्यालय
कॉटन मार्केट, नागपूर -४४००१८
संपर्क
संपादकीय : ९९२२९७००२३
वितरण : ८८८८६४७७५३
जाहिरात : ७४४७७३५८५१ /९३२६९०६०६२
नागपूर कार्यालय संपर्क : ७४४७७३५८५१

नागपूर, अकोला, अमरावती, खामगांव, यवतमाळ, वर्धा, गडचिरोली, वाशीम, भंडारा, गोंदिया, मुंबई, पालघर (ठाणे), नाशिक आणि चंद्रपूर महासागर

# महासागर

Epaper: www.epaper.dainikmahasagar.in nagpurpost@gmail.com / mahasagarngp@gmail.com



* वर्ष ५१ * अंक ५८ * * अमरावती * शनिवार, दिनांक ३० ऑगस्ट २०२५ ८ पाने ● किमत रू. २/-+ वितरण खर्च रू. १ = एकुण ३ रू.) * विशेष ऑफर : महासागर + नागपूर पोस्ट = ४ रु. फक्त

# मुंबई ठप्प!

## मराठा मोर्चा धडकला
## अनेक मार्ग बंद
## सर्वत्र वाहतुक कोंडी

अग्राग्रलेख

## खरीखरी..

### यांचाही विजय, त्यांचाही विजय

आज मुंबईत आझाद मैदान परिसरात संघर्ष करून मराठ्यांचे नेते बनलेले मनोज जरांगे पाटील यांचे सैनिक प्रचंड मोठ्या संख्येने उपस्थित होते. जरांगे पाटील यांची ताकद काय आहे, त्यांच्या मागे सकल मराठा समाज कसा उभा आहे. हे आज सर्वांना दिसलेले आहे आणि त्यांनी आपली ताकद दाखवून दिलेली आहे हा त्यांचा विजय म्हटला पाहिजे. पण तिकडे सरकार पक्षानेही अत्यंत सावध भूमिका घेऊन जरांगे पाटील यांचे मन वळविण्यात यश मिळवले आहे हे नाकारता येणार नाही. मराठा आरक्षणाचा प्रश्न निश्चितच गंभीर आहे. जरांगे पाटलांना आरक्षण पाहिजे आहे आणि ते ओबीसी मधून पाहिजे आहे. ओबीसी नेते यासाठी तयार नाहीत हे स्पष्ट आहे. आरक्षण तर द्यायचेच आहे यासाठी आम्हाला थोडा वेळ द्या असे सरकार तर्फे सांगण्यात आले आहे. जरांगे यांनी सरकारच्या प्रतिनिधींशी चर्चा करून वेळ देतानाही सरकारच्या रडक्या भूमिकेवर म्हणजेच एक एक दिवसाची परवानगी देण्याच्या भूमिकेवर शब्दशः अंगार ओततच चर्चा केलेली आहे. पण सरकारबद्दल कोणतेही तणावपूर्ण कृती किंवा कार्य झाले नाही याचाच फायदा सरकारला झालेला आहे. कारण कोणताही संघर्ष न होता एवढा मोठा आंदोलनाचा दिवस पार पडला. म्हणजेच मनोज जरांगे पाटील यांच्या शांततावादी भूमिकेसह त्यांचे मन वळविण्यात सरकारला यश आले आहे. अर्थातच सरकारचाही विजय आहे. म्हणजेच सरकारलाही कमीपणा नाही आणि मराठा समाजाचेही तात्पुरते का होईना समाधान झाले. ही आनंददायी बाब असली तरी गेल्या दहा वर्षापासून मराठा समाजाच्या आरक्षणाचा प्रश्न कोर्टाच्या विविध निकालाद्वारे चर्चेमध्ये नेहमीच राहिलेला आहे. आरक्षणाच्या बाबत सध्या पन्नास टक्क्यांची मयार्दा आहे ही मयार्दा महाराष्ट्रात आधीच ओलांडण्यात आलेली आहे. न्यायालयाला यापेक्षा अधिक आरक्षण देता येत नाही. कारण ते मान्य नाही कायद्यातही बसत नाही. ५०% च्या मर्यादेचा कायदा सुरू होण्यापूर्वी तामिळनाडू सारख्या काही राज्यांनी या मर्यादेचे आधीच उल्लंघन केले होते. आता राज्यांना याबाबत निर्णय घेण्याचा घ्यावयाचा असेल तर केंद्र सरकारला आवाहन करून तो निर्णय घेऊ शकतात. कारण तसे अधिकार केंद्र सरकारला आहेत पण केंद्राने महाराष्ट्राच्या बाबतीत निर्णय घेतला तर इतर अनेक राज्यांमध्ये तशीच मागणी होऊ शकते. आपल्या शेजारच्या गुजरातमध्ये अशाच मागणीसाठी एका समाजाला कसे आकर्षित करण्यात आले होते. पण नंतर त्या लढ्याचे नेतृत्व करणारा भाजपच्या दावणीला बांधला गेला आणि त्या आंदोलनाची हवा निघून गेली. मराठा समाजात अत्यंत गरीब असलेला वर्ग फार मोठ्या प्रमाणावर आहे या वर्गालाही सवलत मिळणे निश्चितपणे गरजेचे आहे. आपल्या महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री मराठा समाजाचे मोठे नेते होते. त्यामुळेच स्वर्गीय यशवंतराव चव्हाण यांचे सामाजिक योगदान संपूर्ण महाराष्ट्राला परिचित आहे. त्यांना जवाहरलाल नेहरू यांनी संरक्षण मंत्री म्हणून दिल्लीला बोलावले होते. त्यानंतर महाराष्ट्राच्या मुख्यमंत्री पदावर जवळजवळ १२ ते १३ वर्षे मारोतराव कन्नमवार आणि वसंतराव नाईक या दोन अमराठी तर नेत्यांनी महाराष्ट्राचे मुख्यमंत्री म्हणून कामगिरी बजावली. मराठा समाजासह महाराष्ट्राचे आपले नेते म्हणून आपले नाव कायम टिकवण्यासाठी यशवंतरावांनी तो प्रयोग केला असावा. त्यावेळी महाराष्ट्रामध्ये मराठा समाजाचे बडे नेते म्हणून बाळासाहेब देसाई यांचे नाव घेतले जात होते त्यांना ते पद कधीच मिळाले नाही. त्यानंतर सुद्धा मराठा समाजाचे अनेक नेते मुख्यमंत्रीपदावर आले त्यांनाही मराठा समाजाचा हा प्रश्न गंभीर आहे असे वाटले नाही. आता आरक्षणाचा प्रश्न ऐरणीवर आलेला आहे. सरकारला या प्रश्नाचा निकाल लवकरात लवकर लावावाच लागेल. आपल्या मुख्यमंत्र्यांचे कौशल्य यात कमी पडेल असे अजिबात वाटत नाही. त्यांनी या प्रश्नाचा लवकरात लवकर निकाल लावावा हेच केवळ मराठा समाजाच्याच नाही, तर महाराष्ट्राच्याही फायद्याचे आहे. जरांगे आणि सरकार यांच्यामध्ये छोटेमोठे वाद कितीही असले तरी, जरांगे म्हणतात की आरक्षण द्या आयुष्यभर तुमचे ऋण मानत राहू . कारण आजच्या महामोर्चाने एक पाऊल पुढे टाकले आहे. त्यासोबत सरकारनेही एक पाऊल पुढे टाकलेले आहे, त्यामुळे दोघांचाही जयजयकार असो!

nagpurpost@gmail.com
Mob. No. 9922970023

## आझाद मैदानात जरांगेंचे उपोषण सुरू





■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. २९ :
मनोज जरांगे पाटील मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी हजारो मराठ्यांसह मुंबईत पोहोचलेत. त्यांनी येथील आझाद मैदानावरील आपल्या बेमुदत उपोषणाला सुरुवात केली आहे.

याठिकाणी खबरदारी म्हणून हजारो पोलिसांचा फौजफाटा तैनात करण्यात आला आहे. या आंदोलनामुळे मुंबईच्या वाहतूक व्यवस्थेचे तीन - तेरा वाजलेत. पोलिसांनी नागरिकांना पर्यायी मार्गांचा वापर करण्याचे आवाहन केले आहे.

दरम्यान, मनोज जरांगे व त्यांच्या समर्थकांच्या आंदोलनामुळे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वातील महायुती सरकारवरील दबाव कैकपटीने वाढला आहे.

### गोळ्या घाला, तुरुंगात डांबा मागे हटणार नाही...

मनोज जरांगे यांनी यावेळी पुन्हा एकदा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना निर्वाणीचा इशारा दिला. ते म्हणाले, मायबाप सरकार आणि मुख्यमंत्र्यांनी आम्हाला बेमुदत उपोषण करण्याची परवानगी द्यावी. आमची तुम्हाला सहकार्य करण्याची तयारी आहे. अन्यथा मंगळवारपासून आणखी कोट्यवधी मराठे मुंबईला येणार आहेत.
आमच्या सर्व मागण्यांची अंमलबजावणी करा. इथे कोट्यवधी लोक घेऊन आलेत. आम्ही मजाक करत नाही. मुख्यमंत्र्यांच्या हातून अजूनही संधी गेली नाही. मराठ्यांचे मन जिंकण्याची संधी तुम्हाला आहे. मराठ्यांची नाराजीची लाट तुमच्या अंगावर घेऊ नका. मला आणि माझ्या समाजाला फक्त आरक्षण हवे आहे. तुम्ही त्याच्यात राजकारण करत असाल, तर तुम्ही गोळ्या घातल्या तरी मनोज जरांगे इथून हटत नाही. मी याच ठिकाणी मेलो किंवा तुम्ही मला जेलमध्ये नेऊन टाकले, तरी मी जेलमध्ये उपोषण करेन. पण मराठ्यांच्या डोक्यावर गुलाल टाकल्याशिवाय आता हटणार नाही. त्यामुळे सरकारने आमच्या सर्व मागण्यांची अंमलबजावणी करावी ही आमची विनंती आहे, असे जरांगे यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना इशारा देताना म्हणाले.

मनोज जरांगे म्हणाले की, माझे उपोषण सकाळी १० वाजेपासून सुरू झाले आहे. आपण समाजाला न्याय मिळवून देण्यासाठी इथे आलोय, हे कुणीही विसरू नका. समाजाचे वाटोळे करू नका. कोण काय सांगतंय, कोण काय म्हणतेय हे ऐकूण घेण्यास शिका. आपण शिकलो नाही, लोकांच्या बुद्धीने चाललो, म्हणून आपल्या समाजाचे ७० वर्षे वाटोळे झाले हे कुणीही विसरू नका. समाज मोठा करण्यासाठी आपल्याला ताकद लावायची आहे. आपले ठरले होते मुंबईत येऊन आझाद मैदानावर उपोषण करायचे. त्यानुसार आपले उपोषण सुरू झाले आहे.

सुरूवातीला सरकार आपले ऐकत नव्हते. आपल्याला सहकार्य करत नव्हते. त्यामुळे कोट्यवधी मराठ्यांनी मुंबईला जाण्याचा निर्णय घेतला होता. पण आता सरकार आपल्याला सहकार्य करत आहे. त्यामुळे आपणही सरकार व पोलिसांना सहकार्य केले पाहिजे.

### एक दिवसाची मुदतवाढ

मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी सुरू असलेल्या मनोज जरांगे पाटील यांच्या आमरण उपोषणाला नवे वळण मिळाले आहे. आंदोलनावर अखेर मुंबई पोलिसांनी मोठा निर्णय घेतला असून एका दिवसाची मुदतवाढ दिली आहे. सीएसएमटी स्थानकावरील आंदोलकांची गर्दी, घोषणाबाजी आणि फलाटांवरील झोपेमुळे प्रवाशांना मोठा त्रास सहन करावा लागला. परिणामी आंदोलनाला मुदतवाढ देण्यात आली.

सर्वांनी स्वयंसेवक म्हणून करा. सर्वांनी शिस्त पाळा. पोलिसांना सहकार्य करा. आपली वाहने पोलिसांनी ठरवून दिलेल्या जागेवर नेऊन लावा. कुणीही गडबड, गोंधळ करायचा नाही, दोन तासाच्या आत मुंबई रिकामी व्हायला हवी, असे जरांगे यावेळी मराठा बांधवांना आवाहन करताना म्हणाले.

मराठा आंदोलनाचे अधिक वृत्त
▸▸ पान २ वर

## विहिरीत कार कोसळून ५ ठार

■ वृत्तसंस्था, जालना, दि. २९ :
जालन्यातील राजूर-टेंभुर्णी रस्त्यावर गाडेगव्हाण फाट्याजवळ भीषण अपघात झाला. भरधाव चारचाकीने मॉर्निंग वॉक करणाऱ्या एका व्यक्तीस जोराची धडक दिली आणि नंतर ही कार ७० फूट खोल विहिरीत कोसळली.

या अपघातात कारमधील ५ जणांचा जागीच मृत्यू झाला. क्रेनच्या मदतीने शोधमोहीम राबवली गेली. मात्र खोल पाण्यामुळे कार बाहेर काढण्यात अडचणी येत होत्या. या दुर्घटनेमुळे शोककळा पसरली आहे.

## भारतात ६ लाख कोटींची गुंतवणूक करणार जपान



■ वृत्तसंस्था, नवी दिल्ली, दि. २९ :
पंतप्रधान मोदी शुक्रवारी जपानच्या २ दिवसांच्या दौऱ्यावर गेले. यादरम्यान त्यांनी टोकियो येथे झालेल्या भारत-जपान संयुक्त आर्थिक मंचाच्या बैठकीला संबोधित केले.

त्यांनी आपल्या भाषणात भारताला गुंतवणुकीसाठी सर्वोत्तम ठिकाण म्हणून वर्णन केले. मोदी म्हणाले की जपान तंत्रज्ञानात एक पॉवरहाऊस आहे, तर भारत प्रतिभेचे पॉवरहाऊस आहे. केवळ तंत्रज्ञान आणि प्रतिभाच नेतृत्व करू शकतात. मोदी म्हणाले की भारत आणि जपानमध्ये सहकार्याच्या प्रचंड शक्यता आहेत.

मोदींपूर्वी जपानच्या पंतप्रधान इशिबा म्हणाल्या की भारतीय प्रतिभा आणि जपानी तंत्रज्ञान एकमेकांसाठी बनले आहे. पंतप्रधान मोदी येथे १५ व्या भारत-जपान वार्षिक शिखर परिषदेत सहभागी होतील. या परिषदेत दोन्ही देशांमधील धोरणात्मक आणि आर्थिक भागीदारी मजबूत करण्यावर चर्चा होईल. जाण्यापूर्वी त्यांनी सोशल मीडियावर लिहिले की, या भेटीचा उद्देश भारत आणि जपानमधील विशेष धोरणात्मक आणि जागतिक भागीदारी मजबूत करणे आहे.

## मराठा समाजाविषयी सरकार सकारात्मकच

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २९ :
मनोज जरांगे यांच्या आंदोलनामुळे अवघी मुंबई जाम झाली असताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सरकार मराठा समाजाविषयी सकारात्मकच असल्याचे स्पष्ट केले आहे.

सरकार मराठा समाजाविषयी सकारात्मक आहे. त्यांच्याविषयी आमच्या मनात कोणतीही शंका नाही. पण काही लोक जाणिवपूर्वक हा प्रश्न चिघळवण्याचा प्रयत्न करत आहेत. त्यांनी या आंदोलनावर स्वतःची पोळी भाजण्याचा प्रयत्न करू नये. कारण, त्यांचे तोंड भाजेल, असे ते म्हणालेत.

फडणवीस पत्रकारांशी बोलताना म्हणाले, आज सकाळी आंदोलक मुंबईत आलेत. मनोज जरांगे पाटील उपोषणाला बसलेत. त्यांनीही सर्वांना आपल्याला नियमाने उपोषण करण्याचे व सहकार्याचे आवाहन केले आहे. शासनाचीही भूमिका सहकार्याची आहे. लोकशाही पद्धतीने एखादे आंदोलन होत असेल तर त्या आंदोलनाला आडकाठी आणण्याचे कारण नाही. अशा प्रकारच्या आंदोलनाला जे काही सहकार्य लागेल ते सरकार करेल.

विशेषतः उच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशानुरुप या प्रकरणी सहकार्य केले जाईल. आंदोलनाला जे काही सहकार्य लागेल ते सरकार करेल. विशेषतः उच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशानुरुप या प्रकरणी सहकार्य केले जाईल.



### आंदोलनाच्या मागे कोण?

मराठा आरक्षणाचा प्रश्न उफाळून आला असताना राज्यात राजकीय वातावरण चांगलंच तापलं आहे. या आंदोलनाला कोणाचं पाठबळ आहे हे सर्वांना माहीत आहे. आंदोलनामागे काही राजकीय पक्ष आणि नेत्यांचा थेट हात असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले.
या आंदोलनाला रसद कोण पुरवित आहे? हे सर्वांना ठाऊक असल्याचेही मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले.

**तर तोंड भाजेल...**

काही लोकं ओबीसी व मराठा समाजात भांडण लावण्याचा प्रयत्न करत आहेत. अशा प्रकारे आंदोलनावर पोळी भाजण्याचा प्रयत्न करू नका. तुमचे तोंड भाजेल, अशा शब्दात मुख्यमंत्री फडणवीस यांनी अशा प्रवृत्तींना इशारा दिला.

## मोदींना शिवीगाळ प्रकरणात आरोपीला अखेर अटक

### काँग्रेस कार्यालयावर भाजपाचा हल्ला

■ वृत्तसंस्था, पाटणा, दि. २९ :
गुरुवारी बिहारमधील दरभंगा येथे राहुल गांधी यांच्या मतदार हक्क यात्रेदरम्यान मंचावरून पंतप्रधान मोदींना शिवीगाळ केल्याप्रकरणी पोलिसांनी कारवाई केली आहे. दरभंगा पोलिसांनी शुक्रवारी रिझवी उर्फ राजा नावाच्या तरुणाला अटक केली.

आरोपी हा सिंहवाडा पोलीस स्टेशन परिसरातील भापुरा गावचा रहिवासी आहे. सध्या त्याला सिमरी पोलीस स्टेशनमध्ये ठेवण्यात आले आहे. चौकशी सुरू आहे. मिळालेल्या माहितीनुसार, मो. रिझवी हा पिकअप ड्रायव्हर आहे. हे प्रकरण सिमरी पोलीस स्टेशन परिसरातील बिठौली चौकातील आहे. घटनेनंतर सिमरी पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

शुक्रवारी भाजप नेत्यांनी या मुद्द्यावरून निषेध केला. पाटण्यातील काँग्रेस कार्यालयाबाहेर भाजप कार्यकर्त्यांनी घोषणाबाजी सुरू केली. यादरम्यान भाजप आणि काँग्रेस कार्यकर्त्यांमध्ये हाणामारी झाली. दोघांमध्ये लाठ्या आणि विटांचा वापर करण्यात आला. भाजपाचे अनेक कार्यकर्ते लाठ्या घेवून काँग्रेस कार्यालयावर चालून गेले . त्यावेळी दोन्ही पक्षाच्या कार्यकर्त्यांनी एकमेकांवर लाठ्या आणि विटांनी हल्ला केला.

## जे काही देणे शक्य ते नियमांत बसवून देणार!

### जरांगेंच्या आंदोलनावर उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदेंची भूमिका



■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि.२९ :
मनोज जरांगे यांच्या आंदोलनामुळे अवघी मुंबई स्तब्ध झाली असताना उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी या प्रकरणी सरकारची भूमिका स्पष्ट केली आहे. मराठा समाजाला जे काही देणे शक्य आहे ते, कायद्याच्या व नियमांच्या चौकटीत बसवून विशेषतः कुणाचेही आरक्षण कमी न करता व कुणाचेही नुकसान न करता दिले जाईल, असे ते म्हणालेत.

शिंदे म्हणाले, मी मुख्यमंत्री असताना मराठा समाजाला १० टक्के आरक्षण दिले होते. आजही ते आरक्षणाचा लाभ घेत आहेत. कुणबी नोंदी शोधण्यासाठी आपण शिंदे समिती स्थापन केली होती. त्यात हजारो नोंदी सापडल्या होत्या. ही समिती आजही काम करत आहे. सारथीच्या माध्यमातून आपण विविध कोर्सेस सुरू केले. त्याचाही मराठा समाजाला लाभ होत आहे. अण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळाच्या माध्यमातूनही हजारो तरुणांना रोजगारासाठी १५ लाखांचे बिनव्याजी कर्ज उपलब्ध करून देण्यात आले आहे. या विविध योजनांतून मराठा समाजाची मुले यूपीएससी, एमपीएससीच्या माध्यमातून पुढे जात आहेत. स्वतःच्या पायावर उभे टाकत आहेत. त्यामुळे शासन म्हणून आम्ही आमच्या अडीच वर्षांच्या काळात जे जे काही प्रयत्न केले, ते सर्व प्रयत्न मराठा समाजापुढे आहेत.

याउपर या प्रकरणी ज्या काही सूचना येतील त्या सूचनांचाही स्वीकार केला जाईल. पण जे काही योग्य आहे, कायदेशीर आहे, नियमात बसणारे आहे त्यावर सरकार आजही सकारात्मक असल्याचे शिंदे म्हणाले.

## महाराष्ट्रात ३४ हजार कोटींची गुंतवणूक

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि.२९ :
गणेशोत्सवाच्या शुभमुहूर्तावर महाराष्ट्रात मोठ्या प्रमाणात गुंतवणूक होत आहे. राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उद्योग मंत्री उदय सामंत यांच्या प्रमुख उपस्थितीत तब्बल १७ सामंजस्य करारांवर स्वाक्षऱ्या करण्यात आल्या.

या करारांची एकूण किंमत सुमारे ३३,७६८.८९ कोटी रुपये असून, त्यातून राज्यात सुमारे ३३,४८३ रोजगारनिर्मिती होणार असल्याची माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली. टेरिफ वॉर सुरू असतानाही महाराष्ट्राला इतक्या मोठया प्रमाणात गुंतवणूक मिळणे हा गुंतवणूकदारांचा महाराष्ट्रावरील विश्वासच दर्शवितो असेही ते म्हणाले.

या गुंतवणुकीत इलेक्ट्रॉनिक्स, पोलाद, सोलार, इलेक्ट्रिक बसेस व ट्रक्स, संरक्षण व त्यासंबंधित विविध क्षेत्रांचा समावेश आहे. त्यामुळे महाराष्ट्रातील उत्तर महाराष्ट्र, पुणे, विदर्भ, कोकण अशा सर्वच भागांमध्ये उद्योग उभारणीची संधी उपलब्ध होणार आहे.



### ३३ हजार रोजगार निर्मिती

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, गुंतवणूकदारांना महाराष्ट्रात सहज आणि सुरळीत अनुभव मिळावा यासाठी सरकार वचनबद्ध आहे. आम्ही फक्त करार स्वाक्षरीत करून थांबणार नाही, तर गुंतवणुकीच्या प्रत्येक टप्प्यावर राज्य शासन भागीदार म्हणून सोबत राहील. याबाबत कुठेही अडथळा येणार नाही.

यावेळी त्यांनी मैत्री पोर्टल या वन-स्टॉप संकल्पनेचा विशेष उल्लेख केला. उद्योगांसाठी जमीन, परवानग्या आणि इतर मंजुरी तातडीने मिळवून देण्याबाबत शासन प्रयत्नशील असल्याचे ते म्हणाले. ऊर्जाविषयक निर्णयांचा उल्लेख करताना फडणवीस म्हणाले की, राज्यात नुकताच ५ वर्षांचा मल्टी-इयर टॅरिफ मंजूर झाला असून, वीजदर वर्षागणिक कमी होणार आहेत. पूर्वी दरवर्षी वीजदर ९ टक्क्यांनी वाढत असत, पण आता विजेचे दर कमी होणार आहेत. हे उद्योगांसाठी मोठे दिलासादायक ठरणार आहे.

मुख्यमंत्री फडणवीस यांनी पुढे सांगितले की, उद्योग क्षेत्रातील गुंतवणुकीचा जीवनचक्र राज्य सरकारने स्थिर आणि अंदाजपत्रित ठेवण्याचे धोरण स्वीकारले आहे. त्यामुळे गुंतवणूकदारांचा विश्वास वृद्धिंगत होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

# मराठा मोर्चाचा तडाखा

## मनोज जरांगे यांचा लढा आरक्षणाचा नव्हेच!



**■ मुंबई :** ओबीसी नेते लक्ष्मण हाके यांनी मनोज जरांगे यांचा लढा हा आरक्षणाचा नव्हे तर राजकीय अजेंडा असल्याचा आरोप केला आहे.

ते म्हणाले, हा आरक्षणाचा लढा नाही. मीडियाद्वारे मराठा बांधवांच्या शिक्षण व नोकरीचा जो कळवळा दाखवला जात आहे, हे तसे नाही. मनोज जरांगे यांनी मुंबईकडे निघतानाच हा राजकीय अजेंडा असल्याची आपली स्क्रिप्ट फोडली. हा राजकीय कसा? ते म्हणाले की, मी हे सरकार उलथावून लावणार आहे. आम्ही आजपर्यंत यात विरोधी पक्ष सामिल असेल असे म्हणायचो. पण, आता मी जबाबदारीने सांगतो की, देवेंद्र फडणवीस यांचे सरकार उलथावून लावण्यासाठी जसे विरोधी पक्षांचे आमदार खासदार त्यात सामिल आहेत, तसे अजित पवारांचे आमदारही आमदार, खासदार त्यात सामील आहेत. मी हे जबाबदारीने सांगत आहे. मी माज्या पदरचे सांगत नाही. मला राजकीय भानगडीत पडायचे नाही, असे लक्ष्मण हाके यांनी सांगितले आहे.

## जरांगेशी चर्चा करणार



**■ मुंबई :** राष्ट्रवादी काँग्रेसच्या आमदार सना मलिक म्हणाल्या की, मनोज जरांगे पाटील यांच्यासोबत सरकारकडून चर्चा करण्यात येणार आहे. सरकारने आपली भूमिका स्पष्ट केली आहे. आम्ही संपूर्ण विषय समजून घेत त्यावर काय तोडगा काढू शकतो यासाठी प्रयत्न करणार आहोत.अतिथी देवो भवो, जरांगे पाटील माज्या मतदारसंघातून पुढे जात आहे मी त्यांचे स्वागत केल्याचे सना खान म्हणाल्या.

## सामाजिक कार्यकर्ता सरिता खानचंदानी यांनी जीवन संपवले



**■ मुंबई :** महाराष्ट्राच्या सामाजिक कार्यकर्त्या आणि वकील सरिता खानचंदानी यांनी इमारतीच्या सातव्या मजल्यावरून उडी मारून आत्महत्या केली. त्या ठाणे जिल्ह्यातील उल्हासनगर येथे राहत होत्या. त्यांनी त्यांच्या घराच्या इमारतीवरून उडी मारली. त्यामुळे त्या गंभीर जखमी झाल्या. डोंबिवलीमध्ये उपचारादरम्यान त्यांचा मृत्यू झाला. सरिता व्यवसायाने वकील होत्या. महाराष्ट्रात डीजेवर बंदी घालण्यात त्यांनी महत्त्वाची भूमिका बजावली.

उल्हासनगरमधून वाहणाऱ्या उल्हास आणि वालधुनी नद्यांना प्रदूषणमुक्त करण्यासाठी सरिता यांनी काम केले.

उपपोलिस आयुक्त सचिन गोरे म्हणाले की, सरिता यांनी त्यांच्या ऑफिसच्या मागची खोली एका महिलेला भाड्याने दिली होती. बुधवारी खोली रिकामी करण्यावरून दोघांमध्ये भांडण झाले. त्यानंतर महिलेने सरितावर मारहाणीचा गुन्हा दाखल केला होता. सरिता हिरली फाउंडेशन नावाची संस्था चालवत होत्या. त्या उल्हासनगरमधून वाहणाऱ्या उल्हास आणि वालधुनी नद्यांना प्रदूषणमुक्त करण्यासाठी काम करत होत्या. वायू आणि जल प्रदूषणाविरुद्ध काम केल्यामुळे त्यांना अनेक लोकांच्या नाराजीचा सामना करावा लागला.

## शिंदे गटाचे आमदार अमोल खताळ यांच्यावर हल्ला



**संगमनेर :** शिवसेना शिंदे गटाचे आमदार अमोल खताळ यांच्यावर हल्ला झाल्याची घटना समोर आली आहे. संगमनेर फेस्टिव्हलच्या उद्घाटनावेळी हा हल्ला झाल्याची माहिती आहे. या कार्यक्रमात गेले असता अमोल खताळ यांच्याशी हात मिळवण्यासाठी एक तरुण आला आणि यावेळी त्याने हल्ला केला असल्याचे समजते. मात्र, या हल्लूयाचे कारण अद्याप समजू शकले नाही. मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी या भ्याड हल्ल्याचा निषेध केला आहे.

एका वृत्तवाहिनीशी बोलताना राधाकृष्ण विखे पाटील म्हणाले, मी या भ्याड हल्ल्याचा निषेध करतो. हा हल्ला जो कोणी केला आहे, जे कोणी गुंड प्रवृत्तीचे लोक होते व ते कोणाकडून पुरस्कृत होते याची चौकशी करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. परंतु, अशा प्रकारचा भ्याड हल्ला करून महायुतीच्या आमदारांचा कार्यकर्त्यांचा आत्मविश्वास कमी होईल असे वाटत असेल कोणाला तर मला वाटते हा त्यांचा गैरसमज आहे आणि तो गैरसमज सुद्धा दूर करायला वेळ लागणार नाही. राधाकृष्ण विखे पाटील यांचा अप्रत्यक्ष रोख हा कॉंग्रेस नेते बाळासाहेब थोरात यांच्यावर असल्याचे समजते. संगमनेरच्या राजकारणात बाळासाहेब थोरात आणि महायुतीच्या नेत्यांमध्ये वादाची ठिणगी पडली आहे. त्यातूनच हा हल्ला झाला असावा का, अशी चर्चा सध्या सुरू झाली आहे.

---

**■ दीपक कैतके, मुंबई, दि. २९ :**

गणेशोत्सवाच्या तोंडावर राजधानी मुंबई अक्षरशः ठप्प झाली आहे. मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी मनोज जरांगे पाटील यांच्या नेतृत्वाखाली सुरू झालेल्या विराट मोर्चामुळे शहरात वाहतुकीची प्रचंड कोंडी निर्माण झाली आहे. आझाद मैदानाकडे जाणाऱ्या लाखो मराठा बांधवांचा ताफा मुंबईत दाखल झाला असून तब्बल साडेसहा हजारांहून अधिक वाहनं शहरात प्रवेशली आहेत.

या प्रचंड गर्दीचा फटका थेट गणेशभक्तांना आणि चाकरमान्यांना बसला आहे. दादर, सीएसटी, आझाद मैदान परिसरात गर्दी उसळली असून, रस्ते आणि रेल्वे सेवा यावर ताण आला आहे. पोलिसांनी तातडीने ट्रॅफिक ॲडव्हायझरी जारी करत नागरिकांना पर्यायी मार्गांचा वापर करा, अनावश्यक प्रवास टाळा, असं आवाहन केलं आहे.

मुंबईतील महत्त्वाचे रस्ते पूर्णपणे बंद करण्यात आले आहेत. यामध्ये ईस्टर्न फ्रीवे, सायन-पनवेल हायवे, व्ही. एन. पुर्व मार्ग, पी. डी. मेलो रस्ता, वालचंद हिराचंद मार्ग, डॉ. दादाभाई नैरोजी मार्ग आणि हजारीमल सोमानी रस्ता यांचा समावेश आहे.

### पूर्णपणे बंद असलेले मार्ग

वाशी ते पांजरपोळ फ्री वे
सायन ते पनवेल ते पांजरपोळ मार्ग
सी. जी. गिडवाणी ते पांजरपोळ
आय. ओ. सी. जंक्शन व
गोवंडी रेल्वे ब्रिजवरील फ्री वे
देवनार फार्मझ्पांजरपोळ मार्ग

### लोकलवरही ताण

विदर्भ, मराठवाडा, खानदेश आणि पश्चिम महाराष्ट्रातून मोठ्या संख्येने मराठा बांधव रेल्वेमार्गे मुंबईत दाखल होत आहेत. आंदोलक लोकलमधून सीएसटीकडे धावत असल्याने रेल्वेवरही ताण वाढला आहे. दादर, सीएसटी आणि आझाद मैदान परिसरात प्रचंड गर्दी पाहायला मिळत आहे.

### राजकीय दबाव, नागरिकांची पंचाईत

प्रशासनाने आझाद मैदानाची क्षमता केवळ ५ हजार असल्याचं सांगितलं होतं; पण २० हजारांहून अधिक आंदोलक मैदानात दाखल झाल्याने पोलिसांचं नियोजन कोलमडलं आहे. दरम्यान, सरकार सहकार्य करत आहे, त्यामुळे आंदोलकांनी शिस्त पाळावी, असं आवाहन स्वतः मनोज जरांगे यांनी केलं.




मात्र, यामुळे सामान्य मुंबईकर आणि गणेशभक्तांची मोठी कोंडी झाली आहे. कामावर जाणारे चाकरमानी, बाप्पाच्या दर्शनासाठी निघालेले भक्त आणि विद्यार्थी सगळ्यांच्याच हालाला सुरुवात झाली आहे.

### मुंबईतील वाहतूक व्यवस्थेत मोठे बदल

मराठा आंदोलनामुळे मुंबईत झालेल्या गर्दीमुळे मुंबईतील वाहतूक व्यवस्था पूर्णपणे कोलमडली आहे. त्यामुळे पोलिसांनी शहरातील वाहतुकीत मोठे बदल करत आझाद मैदान परिसरातील अनेक रस्त्यांवरील वाहतूक अन्य रस्त्यांवरून वळवली आहे. तर काही मार्ग वाहतुकीसाठी बंद करण्यात आलेत.

### कोणते मार्ग बंद राहतील?

वाशीकडून फ्रीवेकडे जाणारा मार्ग. वाशीकडून येणाऱ्या साऊथ बॉण्डने पांचरपोळ-फिवेकडे जाणारी सर्व प्रकारच्या वाहनांना निर्बंध असल्याचं सांगण्यात आलं आहे. वीर जिजाबाई भोसले मार्गावरून ट्रॉम्बेकडे जाणारा मार्ग आणि छेडानगरवरून फ्री वेकडे जाणारा मार्ग बंद करण्यात आला आहे.



मराठा आंदोलकांनी मुंबईत वेगवेगळ्या ठिकाणी आंदोलनाला सुरुवात केली आहे. काही आंदोलकांनी मुंबई महापालिकेबाहेर आंघोळ करून आपले आंदोलन केले. मनोज जरांगे पाटील मुंबईत तब्बल तीन हजार गाड्या घेऊन दाखल झाले आहेत. त्यामुळे मुंबईत वाहतूक कोंडी झाली आहे.

### पर्यायी मार्ग कोणते?

वाशीहून येणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना साऊथ बॉण्डने मानखुर्द टी जंक्शन ब्रीज स्लीप रोडने उजवे वळण घेऊन वीर जिजाबाई भोसले मार्गाने आयओसी जंक्शन व छेडानगर मार्गाने मुंबई शहरात प्रवेश करतील.

घाटकोपर-मानखुर्द लिंक रोडने जाणारी वाहने छेडानगर मार्गाने मुंबईत प्रवेश करतील. छेडानगरवरून फ्रीवेकडे जाणारी वाहने अमरमहल, नेहरूनगर ब्रीजमार्गे जातील.

सदर आदेश आजपासून पुढील आदेशापर्यंत अंमलात राहणार आहेत, असे पोलिसांनी स्पष्ट केले आहे.

### रेल्वेत प्रचंड गर्दी

मराठा आंदोलक राज्याच्या कानाकोपऱ्यातून मुंबईत येत आहेत. त्यामुळे रेल्वे ओसंडून वाहत आहेत. हार्बर, मध्य आणि पश्चिम रेल्वेच्या लोकल ट्रेन आंदोलकांनी भरल्या आहेत. एक मराठा लाख मराठा घोषणा दिल्या जात आहेत. भगवे टी शर्ट आणि टोपी घातलेले कार्यकर्ते घोषणा देत आहेत.

### तर गुवाहाटीला जाणार काय?

मुंबई ही मराठी माणसांची राजधानी आहे. न्याय हक्कासाठी मराठी माणूस मुंबईत नाही येणार तर काय गुजरात गुवाहाटीला जाणार? नाईलाजाने मराठी माणसाला न्याय हक्कासाठी मुंबईला यावे लागले आहे.

सरकारने पुढाकार घेऊन त्यांच्याशी संवाद साधला पाहिजे. मराठी माणसे दंगल करायला नाही, तर न्याय हक्कासाठी आली आहेत, असे उद्धव ठाकरे यांनी आज पत्रकारांशी संवाद साधताना म्हटले आहे.

ठाकरे गटाचे खासदार ओमराजे निंबाळकर व आमदार कैलास पाटील हे जरांगेंच्या भेटीसाठी आझाद मैदानावर पोहोचलेत. त्यांनी जरांगे यांची भेट घेत बराच वेळ चर्चा केली.

### महिन्याभराचा किराणा घेऊन मराठा आंदोलक मुंबईत

मनोज जरांगे पाटील यांच्याबरोबर मुंबईत दाखल झालेले मराठा आंदोलक सरकारविरोधात आक्रमक झाले आहेत. एक महिन्याभराचा किराणा साहित्य घेऊन ते मुंबईला धडकलेत. ओबीसीमधून आरक्षण मिळणार नाही तोपर्यंत मुंबई सोडणार नसल्याची भूमिका या आंदोलकांनी घेतली आहे. आझाद मैदानात मुलभूत सुविधा न पुरवल्यावरूनही त्यांनी बीएमसीच्या कारभारावर नाराजी व्यक्त केली.

### आ. सोळंके, आ. क्षीरसागर आझाद मैदानावर

सत्ताधारी राष्ट्रवादी काँग्रेसचे आमदार प्रकाश सोळंके आणि राष्ट्रवादीच्या शरद पवार गटाचे आमदार संदीप क्षीरसागर यांनी मनोज जरांगे यांच्या आंदोलनस्थळाला भेट दिली. यावेळी त्यांनी जरांगे यांच्या आंदोलनाला पाठिंबा असल्याची घोषणा केली. जरांगे पाटलांच्या संघर्ष समाजासाठी सुरू आहे. त्यामुळे त्याला आमचा पाठिंबा आहे. आम्ही मागील दोन महिन्यांपासून सरकारला या प्रकरणी सकारात्मक तोडगा काढण्याची विनंती करत आहोत. या प्रकरणी ठाम भूमिका घेण्याची सरकारची हीच वेळ आहे, असे हे दोन्ही नेते यावेळी बोलताना म्हणाले.

## मुंबई दोन तासांत मोकळी झाली पाहिजे....जरांगे पाटलांचा थेट आदेश!



मराठा आरक्षणाच्या लढ्याला निर्णायक वळण देत मनोज जरांगे पाटील अखेर शुक्रवारी हजारो समर्थकांसह मुंबईच्या आझाद मैदानात दाखल झाले. मागील काही दिवसांपासून ते मैदानात येणार की नाही, याबाबत सुरू असलेल्या चर्चेला यानिमित्ताने पूर्णविराम मिळाला.

बुधवारी रात्रीपासून आझाद मैदानात ठाण मांडून बसलेल्या मराठा समाजाच्या हजारो बांधवांची नजर फक्त एका घोषणेकडे लागलेली होती. आणि जेव्हा जरांगे पाटील मंचावर उभे राहिले, तेव्हा त्यांनी थेट आंदोलकांना आदेशच दिला, तुम्ही जाम केलेली मुंबई दोन तासांत मोकळी झाली पाहिजे!

जरांगे म्हणाले, सरकार सहकार्य करत आहे. आपण ठरल्याप्रमाणे मुंबईत आलो आहोत. आता प्रत्येकाने आपल्या वाहनांना पोलिसांच्या सांगण्यानुसार हटवून ट्रॅफिक सुरळीत करावा. एकही वाईट बातमी बाहेर यायला नको आणि पोलीस नाराज होता कामा नये.

त्याचवेळी त्यांनी सरकारलाही स्पष्ट इशारा दिला, आम्ही समाजाला न्याय मिळवण्यासाठी आलो आहोत. मागण्या मान्य झाल्याशिवाय मागे हटणार नाही. सरकारने परवानगी द्यायची जबाबदारी त्यांची आहे, आणि आम्ही ती मागणारच. पण माझ्या मराठ्यांची मान खाली जाणार नाही.

आता खरी उत्सुकता याचीच आहे की, जरांगे पाटलांचे हे आक्रमक आवाहन सरकारला झुकवणार, की पुन्हा एकदा लढ्याला नवा कलाटणी देणार? मनोज जरांगे यांच्या या आंदोलनाने सरकार कोंडीत सापडल्याचे दिसते.

## पिंपरी-चिंचवडमध्ये होणार 'आयआयएम'ची स्थापना

### पुण्याच्या शिरपेचात मानाचा तुरा




**■ वृत्तसंस्था, पुणे, दि. २९ :**

महाराष्ट्राची शैक्षणिक राजधानी असलेल्या पुण्यात मानाचा तुरा खोवला जाणार आहे. सुमारे ७० एकर जागेवर पिंपरी-चिंचवड शहरात आता इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट म्हणजे,भारतीय व्यवस्थापन संस्था (आय आय एम) स्थापन केली जाणार आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सूचनेवरून, महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी मोशी येथे आयआयएम कॅम्पससाठी जागा दिली आहे.

सध्या देशात २१ भारतीय व्यवस्थापन संस्था (आयआयएम) कार्यरत आहेत. महाराष्ट्र हे एकमेव राज्य आहे जिथे मुंबई व नागपूर अशा दोन आयआयएम आहेत. आयआयएम नागपूर येथील शाखा सुरू होत आहे. वर्षभर यासाठी पाठपुरावा सुरू होता.

उद्योग नगरी, कामगार नगरी, आयटी हब आणि ऑटो हब अशी ओळख असलेल्या पुणे जिल्ह्यात देशातील व्यवस्थापन क्षेत्राची उच्चतम संस्था प्रारंभ करण्याचा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा मानस पूर्ण होत आहे. मुख्यमंत्री फडणवीस यांनी यासाठी पुणे, मुंबई व नागपुरात काही बैठकी घेतल्या.

दरम्यान, महसूल मंत्री यांनी मोशी येथील ७० एकर जागेला मान्यता दिली आहे. 'आयआयएम' च्या कामाला आता गती मिळेल.

भूसंपादनाची प्रक्रिया प्रारंभ होत आल्याने आपण आनंदी आहोत असे सांगून महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले, गणेश आगमनाचा उत्साह सुरू असतानाच शहरात आता आयआयएम सारखी नामांकित संस्था सुरू करण्याच्या कायार्चा श्रीगणेशा झाला आहे.

पिंपरी-चिंचवड हे औद्योगिक शहर असून येथे देशाच्या कानाकोपऱ्यातील नागरिक वास्तव्यास आहेत. मुंबई-पुणे कनेक्टिव्हीटी, औद्योगिक विकास आणि शैक्षणिक वातावरण लक्षात घेता आयआयएमसारखी संस्था सुरू होणे हे शहरासाठी अभिमानास्पद आहे.

## कपिलधारा तीर्थावर ७० हजार महिला

**■ वृत्तसंस्था, नाशिक, दि. २९ :**

ठेंगोडा गिरणा नदीत ऋषीपंचमीनिमित्त स्नानासाठी महीलांची मोठी गर्दी उसळली होती. दिवसभरात कसमादे परीसरातील २० हजार महीलांनी गिरणा नदीत स्नान व सिद्धिविनायक गणपती मंदिरात दर्शन घेतले.

सकाळपासूनच गिरणा नदीपात्रात महिलांची स्नानासाठी मोठी गर्दी उसळली होती. कळवण, देवळा, सटाणा तालुक्यातील वीस हजार महिलांनी खासगी व प्रवासी वाहनांनी येथे हजेरी लावली. गिरणा पाञात स्नान व धार्मिक विधी पार पडल्यानंतर सर्व महिला सिद्धिविनायक गणपती मंदिरात दर्शनासाठी येत असल्याने गिरणापात्र व गणपती मंदिर महिलांच्या गर्दीने फुलून गेले होते. दर्शनासाठी पुलावरून पायी ठेंगोडा येथील गणपती मंदिरात येत असल्याने राष्ट्रीय महामार्ग व गिरणा नदीपुलावर काही काळ वाहतूक कोंडी निर्माण होत होती.

यानिमित्त फुले, फळे, दूर्वा, नारळ पेढे आदीसह पूजेचे साहित्य विक्रीचे मोठ्या प्रमाणात दुकाने थाटण्यात आल्याने लोहोणेर व ठेंगोडा गणपती मंदिर परिसरात याञेचे स्वरुप आले होते. अनुचित प्रकार घडू नये यासाठी देवळा पोलिस स्टेशनचे ९ पोलिस, तीन महिला पोलीस तर सटाणा पोलिस स्टेशनचे तीन पोलिस, दोन महिला पोलिस, चार होमगार्ड असे एकूण २१ पोलिस कर्मचारी बंदोबस्तासाठी तैणात करण्यात आले होते.

## घाणेकर कुटुंबियांकडे पर्यावरणपुरक बाप्पा

**■ महासागर प्रतिनिधी**
**मुंबई, दि. २९ :**

घाटकोपर(प.), मुंबई येथील शिवाजी घाणेकर यांच्या घरी प्रतिवर्षाप्रमाणे याही वर्षी पुठ्ठा आणि कागद यांचा वापर करून इको फ्रेंडली सजावट साकारली आहे.

दरवर्षी घरातील सर्व सदस्य मिळून बाप्पाची आरास तयार करत असतात. सजावटीमध्ये थर्माकोल किंवा पर्यावरणास घातक कोणत्याच पदार्थाचा वापर केला जात नाही. यंदा मंदिराचा देखावा साकारण्यात आला आहे.

घाणेकर कुटूंबीय पर्यावरण रक्षणासाठी सातत्याने काम करीत असून, जगन घाणेकर हे लेखक आहेत. महासागर वृत्तपत्राकरिता ते सातत्याने विविध विषयांवर समाज प्रबोधनपर लेख पाठवत असतात.



## भारतीय सशस्त्र सीमा बलाचा मोरया थेट जम्मू काश्मीरला विराजमान

### डोंबिवलीच्या स्वस्तिक कला केंद्राच्या ४१ वर्षाची अखंडित परंपरा






**■ महासागर प्रतिनिधी**
**मुंबई, दि. २९ :**

गणपती बाप्पा निघाले डोंबिवलीहून थेट जम्मू-काश्मीरला आणि तेही थाटात विमानाने. यावर्षी आणखी एक मानाचा तुरा रोवला गेला तो म्हणजे श्री गणेशाची स्थापना जम्मू- काश्मीर भारतीय आर्मी सशस्त्र सीमा बल कॅम्पमध्ये अत्यंत उत्साह आणि जल्लोषात पार पडला.

बाप्पाची सुंदर मूर्ती सर्वांच्या मनाला भावली. हे शक्य झाले ते डोंबिवलीच्या स्वस्तिक कला केन्द्र मधुन सुंदर आणि मनमोहक अशी बाप्पाची मूर्ती भेटल्यामुळे.

सशस्त्र सीमा बल आणि संपूर्ण कैंपच्या सैनिक, फौजी कडून डोंबिवली स्वस्तिक कला केंद्राचे आभार मानत आहे.

यावर्षी सशस्त्र सीमा बल (भारतीय सेना) जम्मु- काश्मीर यांच्यामुळे गणेश चतुर्थीच्या उत्सवामध्ये सहभागी होण्याची संधी प्राप्त झाली. अशा प्रतिष्ठित व्यासपीठावर आपला सांस्कृतिक वारसा आणि प्रतिभा प्रदर्शित करणे हा आमच्यासाठी खूप अभिमानाचा आणि आनंदाचा क्षण आहे.

कलात्मक अभिव्यक्तींद्वारे एकता आणि अभिमानाचा संदेश पसरवण्याची संधी आणि सीमेवर मोरयाचे विराजमान झाल्याबद्दल सशस्त्र बलातील जवानांनी मेजर गणेश चव्हाण यांचे आभार मानले आहेत.

# प्राधान्य क्षेत्र ठरवून जिल्हा नियोजनातून कामे!- पालकमंत्री बावनकुळे

## वितरीत निधी अखर्चित राहिल्यास कारवाई | नगरपालिकां अंतर्गत राहणार सीसीटीव्हीची निगराणी





**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, ( दि. 29 )**– जिल्हा विकास व नियोजन समितीच्या निधीमधून यावर्षी प्रामुख्याने आरोग्य, शिक्षण, स्वच्छता, पाणीपुरवठा आणि सुरक्षा ही प्राधान्य क्षेत्र ठरवून कामे केली जाणार असल्याचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी सांगितले.

जिल्हा नियोजन सभागृहात झालेल्या बैठकीस खासदार डॉ. अनिल बोंडे, बळवंत वानखेडे, अमर काळे, आमदार धीरज लिंगाडे, संजय खोडके, उमेश यावलकर, प्रविण तायडे, राजेश वानखेडे, केवलराम काळे, प्रताप अडसड, सुलभा खोडके, गजानन लवटे, जिल्हाधिकारी आशिष येरेकर, मुख्य कार्यकारी अधिकारी संजिता महापात्र, महापालिका आयुक्त सौम्या शर्मा, जिल्हा पोलिस अधीक्षक विशाल आनंद, नियोजन अधिकारी वर्षा भाकरे आदी उपस्थित होते.

पालकमंत्री म्हणाले की, विकसित भारत या ध्येयाशी सुसंगत कामे करण्यात येतील. अधिकाऱ्यांच्या दौऱ्यातून मिळालेल्या व्हिजननुसार नियोजन ठरेल. निधीतून होणारी सर्व कामे उत्कृष्ट दर्जाची असावीत, अन्यथा कारवाई केली जाईल, असा इशाराही त्यांनी दिला.

### सुरक्षा आणि स्वच्छतेला प्राधान्य

नगरपालिका क्षेत्रात सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. यासाठी गृह विभागाच्या मार्वल कंपनीसोबत करार होणार आहे. कायदा व सुव्यवस्थेच्या संदर्भात एमडी ड्रग्जविरोधात कठोर पावले उचलण्याच्या सूचना पोलिसांना देण्यात आल्या. परवानगीपेक्षा जास्त वेळ चालणाऱ्या हॉटेलांचे परवाने तत्काळ रद्द करण्याचे निर्देशही दिले.

### स्कायवॉक एप्रिलपर्यंत होणार पूर्ण

रेल्वे पुलाची दुरुस्ती करून हलकी वाहने व पादचारी वाहतुकीसाठी खुला करण्याबाबत प्रयत्न होतील. चिखलदऱ्यातील स्कायवॉक एप्रिलपर्यंत पूर्ण करण्याचे आश्वासन देण्यात आले. तसेच चार इको-टुरिझम स्पॉट्स विकसित करण्यासाठी निधी उपलब्ध करून दिला जाणार आहे.

### निधी वेळेत खर्च न केल्यास कारवाई

सर्व यंत्रणांनी 15 सप्टेंबरपर्यंत प्रशासकीय मान्यता घेऊन 30 सप्टेंबरपर्यंत नियोजन निधी पूर्ण खर्च करणे बंधनकारक असेल. अन्यथा संबंधित विभागप्रमुखांवर कारवाई होईल आणि निधी परत घेऊन पुनर्विनियोजन केला जाईल, असेही पालकमंर्त्यांनी स्पष्ट केले.

### आरोग्य आणि शिक्षणाला प्राधान्य

मेळघाटात आरोग्य परिक्रमा राबवून तज्ज्ञ डॉक्टरांचे शिबिरे आयोजित केली जातील. सुपर स्पेशालिटीमध्ये आयसीयू, रक्तपेढी व रेडिएशन सेंटर उभारण्यावर भर असेल. मनपा व जिल्हा परिषदेच्या शाळांना पायाभूत सुविधा व स्मार्ट वर्गासाठी निधी मिळेल.

# नांदगावपेठ-पांढुर्णा राष्ट्रीय महामार्ग होत आहे खड्डेमय!

## 530 कोटी खर्च करून निर्माण तरीही अपघातांचे प्रमाण वाढले





"राष्ट्रीय महामार्ग विभाग झोपेत असल्याची टीका होत असून, अनेक निष्पाप नागरिक या महामार्गावरील अपघातांमध्ये बळी पडत आहेत. या गंभीर प्रकाराची दखल घेऊन बांधकाम विभाग व संबंधित कंत्राटदारांवर कार्यवाही करण्याची मागणी करण्यात आली आहे.

**रुपेश वाळके,**
**अध्यक्ष, राष्ट्रवादी युवक काँग्रेस, मोर्शी तालुका.**

**महासागर प्रतिनिधी**

**मोर्शी, ( दि. 29 )**– अमरावती जिल्ह्यातील नांदगावपेठ–मोर्शी–वरुड–पांढुर्णा पर्यंत नव्याने निर्माण करण्यात आलेल्या 96 किलोमीटरच्या सिमेंट रस्त्याच्या राष्ट्रीय महामार्गाला अवघ्या चार ते पाच वर्षांतच अनेक ठिकाणी खड्डे व भेगा पडल्या आहेत. त्यामुळे या महामार्गाच्या कामाच्या दर्जावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

या महामार्गावरील सिमेंट रोडवर भेगा आणि खड्डे मोठ्या प्रमाणात पडले असून अपघातांची मालिका वाढली आहे. नांदगाव - पांढुर्णा महामार्गावरील अनेक पॅनल तडकले आहेत. या महामार्गावरील मोर्शी येथील नळा नदीवरील अपूर्ण पूल आणि दापोरी येथील अपूर्ण पूल यामुळे अनेक वाहनांचे अपघात होत असून जीवितहानीही होत आहे.

वरुड, मोर्शी या दोन शहरांसह मध्यप्रदेश व अमरावती शहराला जोडण्यासाठी हा महामार्ग तयार करण्यात आला होता. तब्बल 530 कोटी रुपयांचा खर्च करून या महामार्गाचे बांधकाम करण्यात आले. परंतु पाच वर्षांच्या आतच रस्ता खड्डेमय झाल्याने काम निकृष्ट दर्जाचे झाले असल्याचे स्पष्ट दिसत आहे.

नांदगावपेठ ते मोर्शी (43 किमी) या टप्प्यासाठी 240 कोटी, तर मोर्शी ते पांढुर्णा (53 किमी) या टप्प्यासाठी 290 कोटी खर्च झाले. तरीही दोन्ही टप्प्यांमध्ये रस्ता उखडलेला असून पूल अर्धवट अवस्थेत आहेत. नागरिकांचे म्हणणे आहे की सार्वजनिक बांधकाम विभाग व कंत्राटदारांकडे वारंवार तक्रारी करूनही दखल घेतली जात नाही.

# आणखी चार सराईत गुन्हेगार तडीपार

## शहरात दिसल्यास तात्काळ कळविण्याचे पोलिसांचे आवाहन

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, ( दि. 29 )** – शहर पोलिसांनी आणखी चार सराईत गुन्हेगारांवर तडिपाराची कारवाई केली आहे. सतिश रामभाऊ पालवे (32, रा. जेवड नगर), प्रेम शाम चिलके (19, रा. चिचफैल), कुशल संजय बोबडे (40, रा. सबनीस प्लॉट) व शेख शहबाज उर्फ मुरारी शेख कलीम (20, रा. पठाण चौक) अशी तडिपारांची नावे आहेत.

अमरावती शहरातील सराईत गुन्हेगारांवर नियंत्रण ठेवण्यासाठी पोलिसांनी तडीपाराची कारवाई केली असली तरी हे आरोपी पुन्हा शहरात शिरून गुन्हेगारी कारवाया करण्याची शक्यता नाकारता येत नाही. आगामी सण-उत्सव तसेच स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर नागरिकांनी पोलिसांना सहकार्य करून गुन्हेगारी रोखण्यासाठी मदत करावी, असे आवाहन अमरावती शहर पोलिस आयुक्तालयाने केले आहे. पोलीस विभागाकडून वेळोवेळी या तडीपार आरोपींवर लक्ष ठेवले जात आहे. तरीदेखील, हे आरोपी अमरावती शहरात दिसून आल्यास किंवा त्यांच्या उपस्थितीबाबत खात्रीलायक माहिती मिळाल्यास ती तात्काळ पोलीस विभागाला कळवावी, असे आवाहन करण्यात आले आहे.

### या क्रमांकावर द्या तडिपारंची माहिती

नागरिकांनी खालील क्रमांकावर संपर्क साधून माहिती देऊ शकतात . गुन्हे शाखेचे पोलिस निरीक्षक मो. क्र. 7972478500, पोलीस नियंत्रण कक्ष दुरध्वनी क्र. 0721-2551000 व पोलीस डायल क्र. 112 यावर संपपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

# वीज चोरीचा प्रकार उघड; दोन ग्राहकांवर कारवाई



**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, ( दि. 29 )** – महावितरणला लाखो रुपयांचा चुना लावणाऱ्या दोन ग्राहकांची चोरी अखेर उघड झाली आहे. शहरातील आझाद कॉलनी परिसरातील जाकीर कॉलनी येथील हसन खान दुल्हे खान आणि अलीम खान सलीम खान या दोघांनी तब्बल 4 लाख 75 हजार रुपयांची वीज चोरी केली होती.

महावितरणच्या भरारी पथकाने अचानक धाड टाकत त्यांच्या घरातील मीटर तपासणी केली असता धक्कादायक प्रकार उघडकीस आला. हसन खान याने मीटरमध्ये छेडछाड करून 8744 युनिट्स (2.09 लाख रुपयांची वीज) चोरली. तर अलीम खान याने मीटरमध्ये फेरफार करून 10,638 युनिट्स (2.65 लाख रुपयांची वीज) चोरल्याचे आढळले. या दोन्ही प्रकरणात महावितरणचे कार्यकारी अभियंता सुरेंद्र बालकृष्ण बागडे यांनी दिलेल्या तक्रारीवरून बडनेरा पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास सुरू आहे.

# अप्पर वर्धा धरणाची 9 दार उघडले!

## नदीपात्रात 577 घनमीटर पाण्याचा विसर्ग, पर्यटकांची मोठी गर्दी



**महासागर प्रतिनिधी**

**मोर्शी ( दि. 29 )** – अमरावती जिल्ह्याला वरदान ठरणाऱ्या अप्पर वर्धा धरणाचे 13 पैकी तब्बल 9 दरवाजे आज (29 ऑगस्ट) सायंकाळी पाच वाजता 40 सें.मी. ने उघडण्यात आले. यामुळे धरणातून 577 घनमीटर प्रतिसेकंद इतक्या प्रमाणात पाण्याचा विसर्ग वर्धा नदीच्या पात्रात सुरू करण्यात आला आहे.

सध्या धरणात 482 घनमीटर प्रतिसेकंद पाण्याचा येवा होत असून, सततच्या पावसामुळे जलसाठा झपाट्याने वाढत आहे. विशेष म्हणजे मध्यप्रदेशातील सालबर्डी परिसरातून वाहणारी माडू नदी तुडुंब भरून वाहत असून, यामुळे अप्पर वर्धा धरणाच्या जलसाठ्यात भरघोस वाढ होत आहे.

### धरणातील पाण्याची सद्यस्थिती

धरणाची निर्धारित पातळी - 342.50 मी.
सध्याची पातळी - 342.05 मी.
भराव क्षमता - 92.67 टक्के
28 ऑगस्ट रोजी दुपारी 1 वाजता जलसाठा - 91.75 टक्के

### पर्यटकांची आकर्षण स्थळी गर्दी

दरवाजे उघडताच पाण्याचे तुषार अंगावर झेलण्यासाठी आणि हे विहंगम दृश्य पाहण्यासाठी पर्यटकांनी अप्पर वर्धा धरण परिसरात मोठी गर्दी केली आहे. पर्यटकांच्या सुरक्षिततेसाठी पोलिस बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे.

### गावांना सतर्कतेचा इशारा

पर्जन्यमान व जलाशय प्रचलन सूचीनुसार, येत्या काही दिवसांत अजून पाण्याचा विसर्ग वाढण्याची शक्यता आहे. त्यामुळे नदीकाठच्या खालच्या भागातील गावांनी सतर्क राहण्याचे आवाहन प्रशासनाने केले आहे.

### मागील वर्षीची स्थिती

गेल्या वर्षी 5 ऑगस्ट रोजी केवळ 3 गेट उघडण्यात आली होती, तर 14 ऑगस्ट रोजी तब्बल 11 गेट उघडावी लागली होती. त्यावेळी धरण परिसर आकर्षक रोशनाईने सजवण्यात आला होता. मात्र, यावर्षी पावसाचा वेग कमी असल्याने धरणाची गेट उघडण्यात उशीर झाला आहे.

# चांदूरबाजार तहसील कार्यालयात शिस्तीचा बडगा

## अनुपस्थित कर्मचाऱ्यांवर प्रभारी तहसीलदार तिवारींची कारवाई

**महासागर प्रतिनिधी**

**चांदूर बाजार, ( दि.29 )** – चांदूरबाजार तहसील कार्यालयात वेळेचे भान आणि शिस्त राखण्यासाठी प्रभारी तहसीलदार लक्ष्मीकांत तिवारी यांनी 28 ऑगस्ट रोजी सकाळी अचानक कार्यालयात दाखल होताच अनुपस्थित कर्मचाऱ्यांवर कारवाई केली. त्यांच्या या कृतीमुळे कर्मचा ?यांमध्ये खळबळ उडाली असून, नागरिकांनी या उपक्रमाचे स्वागत केले आहे.



तिवारी सकाळी साडेदहाच्या ठिक वाजता कार्यालयात पोहोचले. मात्र, त्या वेळी कार्यालयात केवळ काहीच कर्मचारी उपस्थित असल्याचे दिसून आले. कार्यालयीन वेळ सुरू झाल्यानंतरही अनेक कर्मचारी अनुपस्थित असल्याने त्यांनी तत्काळ हजेरी पुस्तकाची पाहणी केली. यात पाच शिपाई आणि सहा लिपिक गैरहजर असल्याचे स्पष्ट झाले.

यानंतर प्रभारी तहसीलदारांनी सर्व कर्मचाऱ्यांना वेळेवर हजर राहण्याचे कठोर निर्देश दिले. तसेच वारंवार गैरहजर राहणाऱ्यांविरुद्ध प्रशासन स्तरावर कठोर कारवाई होईल, असा इशाराही दिला.

त्यांच्या या कारवाईमुळे कार्यालयीन शिस्त अबाधित राहील, तसेच नागरिकांना वेळेत सेवा मिळेल अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे. सामान्य नागरिकांकडून या पावलाचे कौतुक होत असून, प्रशासनात वेळेची जाण आणि जबाबदारीची जाणीव निर्माण करण्यासाठी अशा उपाययोजना आवश्यक असल्याचे मत व्यक्त होत आहे.

# गांजा विक्री प्रकरणात आरोपीस 3 वर्षांची सश्रम कारावास

**अमरावती, ( दि. 29 )** गांजाची विक्री करणाऱ्या एका आरोपीस अमरावती जिल्हा न्यायालयाने तीन वर्षांची सश्रम कारावासाची शिक्षा सुनावली आहे. त्याचबरोबर आरोपीस 25,000 दंड ठोठावण्यात आला असून, दंड न भरल्यास सहा महिन्यांचा साधा कारावास भोगावा लागेल. ही घटना वलगाव हद्दीत 3 मे 2020 रोजी घडली होती.

वलगाव पोलिसांना गुप्त माहिती मिळाली होती की, गजानन भिमराव उमेकर (65, रा. रेवसा, वलगाव, ता. अमरावती) हा आपल्या राहत्या घरातून गांजा विक्री करत आहे. या माहितीवरून तत्कालीन पोलीस निरीक्षक बाबाराव अवचार यांच्या पथकाने छापा टाकून आरोपीला रंगेहात पकडले. त्याच्या ताब्यातून 1100 ग्रॅम गांजा जप्त करण्यात आला. याप्रकरणी वलगाव पोलिस ठाण्यात एन.डी.पी.एस. कायद्यान्वये गुन्हा नोंदविण्यात आला होता. या प्रकरणाचा तपास पूर्ण करून, न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्यात आले होते. याप्रकरणाच्या सुनावणी दरम्यान सरकारी पक्षाचे वकील गजानन खिल्लारे व सहायक सरकारी वकील मंगेश भागवत यांनी प्रभावीपणे काम पाहिले. याप्रकरणात एकूण सात साक्षीदारांची साक्ष नोंदविण्यात आली. त्यातील दोन साक्षीदार फितूर ठरले असले तरी, फिर्यादी पोलिस निरीक्षक बाबाराव अवचार यांच्यासह इतर साक्षीदारांच्या ठोस साक्षी, तसेच सरकारी वकिलांचा जोरदार युक्तिवाद लक्षात घेऊन न्यायालयाने आरोपीस दोषी ठरवले. जिल्हा व सत्र न्यायाधीश (क. 1) आ.जी. वाघमारे यांनी दिलेल्या निकालानुसार आरोपी गजानन उमेकर यांना तीन वर्षे सश्रम कारावास व 25,000 दंड ठोठावण्यात आला आहे.

# पांडवांच्या पदस्पर्शाने पावन झालेली गणेशभूमी वायगाव

## महाभारताच्या आख्यायिकेची साक्ष देणारे तीर्थक्षेत्र

**महासागर प्रतिनिधी**

**टाकरखेडा शंभू, ( दि. 29 )**– भातकुली तालुक्यातील वायगाव हे गाव धार्मिक आणि ऐतिहासिक महत्त्वामुळे विशेष ओळखले जाते. येथे असलेली उजव्या सोंडेची अद्भुत गणेशमूर्ती आजही लाखो भक्तांचे श्रद्धास्थान ठरली आहे. महाभारतातील आख्यायिकेनुसार विराट पर्वात पांडव अज्ञातवास संपवून चिखलदऱ्यातून परत येताना वायगाव येथे आले होते. त्यांनी या गणेशमूर्तीचे दर्शन घेतल्याने या मूर्तीला पौराणिक आणि ऐतिहासिक महत्त्व प्राप्त झाले आहे.



सुमारे सहा शतकांपूर्वी झालेल्या खोदकामात ही मूर्ती सापडली होती. मुघल आक्रमणाच्या काळात मूर्तीभंजकांच्या भीतीने ती भूमिगत ठेवण्यात आली होती. अचलपूर, दारापूर आणि खोलापूर परिसरात मुघलांचे ठाणे असल्याने वायगावातील ही मूर्ती बराच काळ जमिनीत लपवून ठेवण्यात आली होती. अखेर इंगोले कुटुंबाच्या घराजवळ ही मूर्ती सापडली आणि वाडारूपी मंदिरात तिची प्रतिष्ठापना करण्यात आली. पुढे भक्तांची वाढती संख्या पाहून इंगोले कुटुंबाने स्वत:ची शेती देऊन भव्य मंदिर उभारले. सध्या मंदिराचे व्यवस्थापन इंगोले आणि पाटील कुटुंबीयांच्या सहकार्याने करण्यात येत असून ट्रस्टचे अध्यक्ष विलास इंगोले आहेत.

मंदिरात दरवर्षी दोन प्रमुख उत्सव मोठ्या भक्तिभावाने साजरे केले जातात. भाद्रपद शुक्ल चतुर्थीपासून पौर्णिमेपर्यंत चालणाऱ्या गणेशोत्सवात दररोज अन्नदान, ज्ञानदान, भजन, कीर्तन आणि हरिपाठ यासारख्या धार्मिक उपक्रमांचे आयोजन केले जाते. तसेच गणेश जयंतीलाही हजारो भाविक महाराष्ट्र, मध्यप्रदेश आणि शेजारील राज्यांतून दर्शनासाठी वायगावला येतात.

मुंबईनंतर महाराष्ट्रात अशी उजव्या सोंडेची अद्वितीय सिद्धिविनायक मूर्ती फक्त वायगाव येथेच आहे. मूर्तीच्या पायावर पद्म आणि शंख चिन्ह कोरलेले असून उजव्या बाजूस



सिद्धी व डाव्या बाजूस रिद्धी विराजमान आहेत. मूर्तीच्या हातातील माळ आणि मोदक हे ऐहिक समृद्धीचे प्रतीक मानले जाते. उत्तरायण व दक्षिणायण या दोन्ही संक्रांतीला सूर्योदयाची पहिली किरणे थेट मूर्तीवर पडतात, हीदेखील या मूर्तीची वैशिष्ट्यपूर्ण देणगी आहे.

इतिहास, श्रद्धा आणि महाभारतातील आख्यायिका यांचा संगम घडवणारे वायगावचे सिद्धिविनायक मंदिर भाविकांसाठी केवळ अध्यात्मिक आधार नसून सांस्कृतिक परंपरेचीही जिवंत साक्ष ठरले आहे.

# फायरींग करुन प्राणघातक हल्ला करणारे जेरबंद

## अमरावती शहर गुन्हे शाखेची धडाकेबाज कारवाई

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, ( दि. 29 )** – अमरावती शहरातील फ्रेजरपुरा परिसरात झालेल्या प्राणघातक हल्ल्याप्रकरणी गुन्हे शाखेने तात्काळ धडाकेबाज कारवाई करत तिन्ही आरोपींना जेरबंद केले आहे. या आरोपींनी फिर्यादी व त्यांचे वडिलांवर बंदुकीतून गोळीबार करून आणि तलवारीने वार करत जीव घेण्याचा प्रयत्न केला होता. 28 ऑगस्ट रोजी रात्री ही घटना घडली.



फिर्यादी अयान शेख हे आपल्या वडिलांसह दुकानासमोर उभे असताना आरोपी सयद अबूजर उर्फ मस्तान (19, रा. हबीब नगर), मोहम्मद रेहान (20, रा. सुफीयान नगर) व एक विधीसंघर्षित बालक बाईकवर येऊन शिवीगाळ व धमक्या देऊ लागले. वाद वाढल्यावर आरोपी अबूजरने कंबरेतून बंदूक काढून गोळीबार केला, तर रेहानने गाडीला लावलेली तलवार काढून हल्ला केला. या प्राणघातक हल्ल्यातून फिर्यादी व त्यांचे वडील बचावले. याप्रकरणी फ्रेजरपुरा पोलिस ठाण्यात गुन्हा नोंदविण्यात आला होता. या घटनेची गंभीर दखल घेत गुन्हे शाखेचे पोलिस निरीक्षक संदीप चव्हाण यांनी तातडीने विशेष पथके स्थापन केली. गुप्त माहितीवरून आरोपी धरमकाटा परिसरात लपल्याचे निष्पन्न झाले. त्यानंतर सहायक पोलिस निरीक्षक मनीष वाकोडे यांच्या पथकाने मोठ्या शिताफीने तिन्ही आरोपींना अटक केली. चौकशीत त्यांनी गुन्ह्याची कबुली दिली असून पुढील तपासासाठी त्यांना फ्रेजरपुरा पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले आहे.

### आरोपीचा गुन्हेगारी इतिहास मोठा

गुन्हेगारांचा मोठा गुन्हेगारी इतिहास असून त्यांच्यावर खुनाचा प्रयत्न, शस्त्रास्त्र बाळगणे यांसह विविध गंभीर गुन्हे गाडगेनगर, राजापेठ व नागपुरी गेट पोलीस ठाण्यात नोंद आहेत. ही धडाकेबाज कामगिरी पोलिस आयुक्त अरविंद चावरीया, उपायुक्त गणेश शिंदे, रमेश धुमाळ, सहाय्यक पोलिस आयुक्त शिवाजी बचाटे यांच्या मार्गदर्शनाखाली, पोलिस निरीक्षक संदीप चव्हाण यांच्या नेतृत्वात एपीआय मनीष वाकोडे व त्यांचे सहकारी फिरोज खान, सतिश देशमुख, मंगेश लोखंडे, रंजीत गावंडे व नाजीमोददीन यांनी केली.

आरएनआय ४६९७५/१९८५ महासागर अमरावती

मालक, मुद्रक, प्रकाशक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरूणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर १८ येथे छापून दैनिक महासागर कार्यालय, होटल टूरिस्टच्या बाजूला रेल्वे स्टेशन चौक, अमरावती येथे प्रकाशित केले. संपादक -श्रीकृष्ण तनसुखदास चांडक ( पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर राहील ) अमरावती मुख्य कार्यालय, पत्ता. दैनिक महासागर, होटल टूरिस्टच्या बाजूला रेल्वे स्टेशन चौक अमरावती, फोन नं. ९५१८९३४५०४

# शिक्षक होण्याच्या स्वप्नाचा भंग

शिक्षक हा समाजाचा दीपस्तंभ मानला जातो. ज्ञान, संस्कार आणि मूल्यांचे संगोपन करणाऱ्या या व्यवसायाकडे लाखो तरुण मोठ्या आशेने पाहतात. महाराष्ट्रासारख्या शैक्षणिकदृष्ट्या प्रगत राज्यात तरुणांनी शिक्षक होण्याचे स्वप्न पाहणे हे स्वाभाविकच आहे. मात्र गेल्या दोन-अडीच वर्षांपासून राज्यातील उच्च व तंत्र शिक्षण विभागातील भरतीप्रक्रिया अक्षरशः ठप्प आहे. आज होईल भरती, उद्या होईल भरती, महिन्याभरात होईल भरतीह्व अशा घोषणा केल्या जात आहेत, परंतु प्रत्यक्षात एकही ठोस निर्णय होताना दिसत नाही. ही केवळ प्रशासकीय ढिलाई नाही तर तरुणाईच्या भविष्याशी खेळलेली एक क्रूर थट्टा आहे.

------------

## घोषणांचा खेळखंडोबा की तरुणांची वेदना?

पूर्वार्ध

शासनाच्या घोषणांवर विश्वास ठेवून आपले वय, परिश्रम आणि स्वप्ने पणाला लावणाऱ्या हजारो तरुणांना आज वेदनादायी परिस्थितीला सामोरे जावे लागत आहे. भरती होणार, उद्या भरती होणार, महिनाभरात भरती जाहीर होणार, या केवळ घोषणांवर सरकारने तरुणांना आशेवर ठेवले आहे. परंतु आजवर प्रत्यक्षात काहीच झालेले नाही. म्हणूनच खरा संशोधनाचा प्रश्न असा आहे की, सरकारला नेमकी जाग कधी येणार?

दरवर्षी नेट परीक्षा दोनदा आणि सेट परीक्षा एकदा घेतली जाते. याशिवाय पी.एच.डी. धारकांची संख्याही झपाट्याने वाढत आहे. म्हणजेच पात्र उमेदवारांची कमी नाही. तरी जागांची भरती अघोषित बंदीखाली ठेवण्यात आली आहे.

यामध्ये अनेक तरुणांचे वय वाढत चालले आहे. काही जण १५-२० वर्षांपासून तासिका तत्त्वावर काम करून स्वतःचे तारुण्य पणाला लावत आहेत. स्थिर नोकरी, भविष्य निर्वाह निधी, पेन्शन, वैद्यकीय सुविधा यापैकी काहीही न मिळता त्यांनी केवळ अध्यापनाच्या आवडीपायी जीवन व्यतीत करीत आहे. उद्या ते आहे त्या नोकरीवर राहतील की नाही, ही भिती त्यांना नेहमी असते. प्रश्न असा आहे की, या तरुणांचा विचार सरकार कधी करणार?

**प्रगतिशील महाराष्ट्राचे मागे पडलेले शिक्षण :**

कधीकाळी प्रगतिशीलतेचे प्रतीक मानले गेलेले महाराष्ट्राचे शिक्षणक्षेत्र आज अधोगतीच्या मार्गावर आहे. देशात आघाडीवर असलेले हे क्षेत्र आता मागे सरकत चालले आहे. याला कारण शासनाची शिक्षणाकडे बघण्याची असलेली नकारात्मक दृष्टी ही आहे.

सरकार तरुणांकडे रोजगार निर्मितीच्या दृष्टीने पाहत नाही. उलट तरुणांचा वापर फक्त धार्मिक कार्यक्रमांचे व्यवस्थापन, झेंडे हातात घेणे आणि राजकीय मेळाव्यांसाठी केला जातो. त्यामुळे सर्वसामान्यांच्या मनात प्रश्न निर्माण होतो,तरुणांना फक्त भक्त बनवायचे आहे का, की त्यांचे भविष्य घडवायचे आहे?

**शिक्षक भरती आणि तरुणांची वेदना :**

महाराष्ट्रातील उच्च व तंत्र शिक्षण विभागात ५५ ते ६० टक्के जागा रिक्त आहेत. त्याच प्रमाणे २००४-०५ पासून शिक्षकेत्तर कर्मचारी भरती बंद असल्याचे नोंद आहे. तब्बल २० वर्षांपासून भरती न झाल्यामुळे उच्च व तंत्र शिक्षण विभागात हजारो पदे रिक्त आहेत.

तथापि, या जागांची भरती करण्याऐवजी शासन केवळ घोषणांची आतीषबाजी करत आहे. उदा.२०१४ मध्ये भाजप पक्षाने दरवर्षी दोन कोटी रोजगार संधी उपलब्ध करून देऊ, अशी घोषणा केली होती, परंतु प्रत्यक्षात काहीच घडले नाही.

शिक्षण क्षेत्रात बदल घडवण्यासाठी राष्ट्रीय शैक्षणिक धोरण- २०२० लागू केले गेले आहे, परंतु त्याची अंमलबजावणी केवळ कागदावरच आहे. शासनाने या धोरणाच्या अंमलबजावणीसाठी आवश्यक पावले उचलली नाहीत, ज्यामुळे शिक्षण क्षेत्रात सुधारणा होऊ शकलेली नाही.

**चुकीच्या योजनांना पैसा शिक्षणासाठी नाही :**

महाराष्ट्रातील शिक्षण क्षेत्रातील समस्यांमागे एक विरोधाभासपूर्ण धोरण स्पष्टपणे दिसून येते. शासनाकडे मोठ्या प्रमाणात आर्थिक साधने उपलब्ध असून, ती अनेक योजनांवर खर्च केली जातात, ज्या प्रत्यक्षात लोकांच्या जीवनावर फारसा परिणाम करत नाहीत.



प्रा. डॉ. प्रशांत विघे
राज्यशास्त्र विषयाचे लेखक
भारतीय महाविद्यालय, अमरावती.
९३२६८७७७४९

उदा, भव्य जाहिराती, प्रचारात्मक मोहिमा किंवा सामाजिक कार्यक्रमांसाठी मोठा आर्थिक खर्च केला जातो, पण मानवी विकासाठी मुलभूत गरज असलेल्या शिक्षण क्षेत्र दुर्लक्षित आहे.

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण - २०२० मध्ये शिक्षण क्षेत्रासाठी जी ६% जीडीपी खर्च करण्याची तरतूद करण्यात आलेली आहे, ती भारताच्या शिक्षण व्यवस्थेच्या सुधारणा आणि विकासासाठी महत्त्वपूर्ण मानली जाते. पण प्रत्यक्षात, या उद्दिष्टापर्यंत पोहोचण्याचे प्रमाण कमी आहे.

२०२४-२५ च्या केंद्रीय अर्थसंकल्पानुसार, भारतातील सार्वजनिक शिक्षण खर्च जीडीपीच्या २.९% इतका आहे, जो राष्ट्रीय शैक्षणिक धोरण एनईपी २०२० च्या ६% च्या उद्दिष्टापेक्षा खूपच कमी आहे. अर्थात, राष्ट्रीय शैक्षणिक धोरण एनईपी २०२० मध्ये शिक्षणासाठी ६% जीडीपी खर्च करण्याचे उद्दिष्ट ठेवले असले तरी, प्रत्यक्षात हे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी आवश्यक पाऊले उचलली जात नाहीत ही दुर्दैवी बाब आहे.

विशेषतः शिक्षक भरतीसाठी किंवा तरुणांच्या रोजगार निर्मितीसाठी आवश्यक ती आर्थिक तरतूद केली जात नाही. या परिस्थितीमुळे तरुणांच्या मनात असंतोष आणि संतापाची भावना निर्माण होते. जे तरुण वर्षानुवर्षे मेहनत करून पात्र ठरले आहेत, त्यांचे भविष्य अंधकारमय बनत आहे आणि त्यासाठी शासनाकडे आवश्यक साधने असूनही त्याचा उपयोग होत नाही.

हा विरोधाभास स्पष्ट करतो की शासनाची प्राथमिकता फक्त दृष्टीस पडणाऱ्या योजनांवर आहे, तर मुलभूत आणि दीर्घकालीन गरजा, शिक्षण, रोजगार, शाश्वत नोकऱ्या बाजूला ठेवण्यात येत आहेत. यामुळे तरुणांचा विश्वास सरकारवर कमी होत आहे आणि समाजातील असंतोष वाढतो आहे.

**राजकीय विसंगती**

महाराष्ट्रातील महायुती सरकार या शिक्षक भरतीच्या प्रश्नावर स्पष्ट आणि एकसंध भूमिका घेताना दिसत नाही. मुख्यमंत्री (भाजप) सांगतात की, भरती अंतिम टप्प्यात आहे, तर उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील (भाजप) लवकरच भरती सुरू होणार आहे, असे आश्वासन देतात. त्याच वेळी अर्थमंत्री अजित पवार (महायुतीचे घटक पक्ष नेते) जागा भरती प्रक्रियेवर बोलत नाही. उच्च पदस्थ कर्मचारी सांगतात की, फाईल अद्याप वित्त विभागाकडे अडकली आहे.

याचा अर्थ असा की, एकाच सत्तेत असलेले नेते शिक्षक भरतीसंदभार्तील महत्त्वाच्या निर्णयांवर एकमत साधू शकलेले नाहीत. प्रत्येकजण जबाबदारी दुस?यावर ढकलत असल्याने भरती प्रक्रियेच्या ताणतणावाचा भार फक्त तरुणाईवर येतो. यामुळे ना केवळ शिक्षक उमेदवार गोंधळलेले आहेत, तर सर्वसामान्य नागरिकांच्या मनातही प्रश्न निर्माण झाला आहे.

एकाच आघाडीतील नेते असूनही, शिक्षक भरतीसारख्या अत्यंत महत्त्वाच्या प्रश्नावर सरकार एकमत का करू शकत नाही? हा चिंतनाचा प्रश्न आहे. सत्तेत असूनही निर्णय न घेणे, जबाबदारी टाळणे आणि शासनाच्या धोरणात विसंगती ठेवणे हा फक्त प्रशासकीय अपयशाचा प्रश्न नाही. हे तरुणांच्या भवितव्याशी थेट खेळणाऱ्या राजकीय निर्णयांचा परिणाम आहे.

शिक्षक भरतीसाठी अपेक्षित ती त्वरित कारवाई न होणे आणि विविध राजकीय मतभेदांमुळे प्रक्रिया ठप्प पडणे, सामान्य जनता आणि पात्र उमेदवारांची आशा धूसर करते.

परिणामी, हजारो तरुण वर्षानुवर्षे मेहनत करून पात्र ठरले तरीही असुरक्षिततेच्या अधिवासात अडकले आहेत. त्यांचे स्वप्नभंग होतो आणि सामाजिक-सांस्कृतिक जीवनावरही परिणाम होतो. हा विषय राजकीय निर्णय, प्रशासनातील विसंगती आणि सामाजिक परिणाम या तिन्ही स्तरांवर गंभीर चिंतनाचा विषय बनतो.

**तरुणांचे जीवन: वेदनेचे चित्र**

महाराष्ट्रात शिक्षक भरतीच्या विलंबामुळे तरुणांचे जीवन आता गंभीर संकटात आले आहे. हा प्रश्न केवळ रोजगारापुरता मर्यादित नाही. त्याचे सामाजिक, मानसिक आणि शैक्षणिक परिणाम दीर्घकालीन स्वरूपाचे आहेत. वर्षानुवर्षे अभ्यास करून आणि पात्र ठरून देखील भरती न झाल्यामुळे अनेक तरुण खचून जात आहेत.

त्यांच्या मेहनतीचे आणि शिक्षणाचे फळ मिळण्याची शाश्वती राहिलेली नाही. ही मानसिक दडपणाची अवस्था त्यांचा आत्मविश्वास कमी करते आणि भविष्यासंबंधी असुरक्षितता निर्माण करते. एकीकडे उच्च शिक्षण घेत असतांना २५ ते २६ वर्ष लागतात.

दुसरीकडे स्थिर नोकरी न मिळाल्यामुळे तरुणांच्या वैवाहिक जीवनावरही परिणाम होत आहे. अनेक तरुण विवाहाच्या योग्य वयात स्थिर आर्थिक आणि सामाजिक सुरक्षा मिळवू शकत नाहीत, ज्यामुळे त्यांचे वैवाहिक आणि भविष्यातील योजनांमध्ये अडचणी निर्माण झाल्या आहेत.

नोकरीसंबंधी असुरक्षिततेमुळे तरुणांमध्ये नैराश्य, चिंता आणि आत्मविश्वासाचा अभाव वाढत आहे. सततच्या अनिश्चिततेमुळे त्यांच्या मानसिक स्वास्थ्यावर नकारात्मक परिणाम होत असून, समाजात निराशेचे वातावरण निर्माण झाले आहे.

रिक्त पदांमुळे महाविद्यालयांत दर्जेदार अध्यापन होत नाही. शिक्षकांच्या कमतरतेमुळे विद्यार्थ्यांना आवश्यक मार्गदर्शन मिळत नाही, अभ्यासक्रम पूर्णपणे आकलन होण्याची शक्यता कमी होते, त्यामुळे शिक्षणाची गुणवत्ता घटते.

यातून स्पष्ट होते की शिक्षक भरतीच्या विलंबामुळे तरुणांचे संपूर्ण जीवनच प्रभावित होत आहे. त्यांच्या स्वप्नांची थोडीशीही पूर्तता होत नाही, सामाजिक आणि कौटुंबिक जीवनावर परिणाम होतो, आणि संपूर्ण शिक्षण व्यवस्थेवर नकारात्मक परिणाम होतो. ही स्थिती तातडीने सुधारण्याची आवश्यकता आहे.

**आकडेवारी आणि वास्तव**

महाराष्ट्रातील उच्च शिक्षण क्षेत्र सध्या गंभीर संकटातून जात आहे. राज्यात सुमारे १५ राज्य विद्यापीठे आणि ५०० पेक्षा जास्त महाविद्यालये कार्यरत आहेत. दरवर्षी हजारो शिक्षक निवृत्त होतात. तसेच नवीन अभ्यासक्रम सुरू होतात, ज्यामुळे हजारो पदे रिक्त राहतात.

या रिक्त पदांच्या भरतीसंबंधी प्रत्यक्ष काहीही घडलेले नाही. सरकारकडून फक्त घोषणा होत राहिल्या, पण त्या कागदी राहिल्या. ही आकडेवारी स्पष्ट करते की, राज्याच्या उच्च शिक्षण धोरणात दांभिकपणा आणि कार्यक्षमतेचा अभाव आहे. प्रत्यक्ष गरज आणि धोरणातील घोषणांमध्ये मोठा अंतर असल्यामुळे तरुण अभ्यासक आणि शिक्षक वर्गाच्या भवितव्यास गंभीर धोका निर्माण झाला आहे. जर तात्काळ भरती प्रक्रिया सुरळीत केली नाही, तर उच्च शिक्षणाच्या गुणवत्तेवर दीर्घकालीन परिणाम होतील, तसेच शिक्षक वर्गातील असंतोष वाढेल, ज्याचा थेट परिणाम विद्यार्थ्यांवरही होईल.

--------------------

(उर्वरीत भाग पुढील अंकी)

■ ■ ■

# भटक्या कुत्र्यांची दहशत कायम

भटक्या कुत्र्यांचा धुडगूस केवळ मुंबई, दिल्लीपुरताच मर्यादित नाही तर देशातील प्रत्येक लहान मोठया शहरात त्यांच्या फौजेने जनतेला हैराण केले आहे.

भटक्या कुत्र्यांना वेळीच आवरा, त्यांची रवानगी श्वान आश्रमात करा, त्यांचे प्रजोत्पादन नियंत्रणाखाली ठेवण्यासाठी ठोस उपाय योजा असे आदेश सर्वोच्च न्यायालयाने दिले असले तरी प्रत्यक्ष व्यवहारात कितपत ते शक्य आहे? लाखो भटक्या कुत्र्यांना पकडून सरकारी निवाऱ्यात एकत्र ठेवणे, त्यांना खाणे पिणे देणे, त्यांना औषधोपचार पुरवणे, त्यांना शी शू साठी फिरायला नेणे हे शक्य आहे का?

एवढे मनुष्यबळ व त्यांना संभाळण्यासाठी एवढा मोठा निधी आहे का? त्यांना संभाळायचे झाले तर तो खर्च कोण देणार? देशाच्या राजधानीत भटक्या कुत्र्यांना पकडण्यासाठी महापालिका प्रशासनाचे पथक जाळ्या घेऊन आले तेव्हा दिल्लीत काही ठिकाणी श्वानप्रेमींनी त्यांना विरोध करून पिटाळून लावले. मग भटक्या कुत्र्यांना पकडणार तरी कसे?



स्टेटलाईन
डॉ. सुकृत खांडेकर
sukritforyou@gmail.com

लहान- मोठ्या शहरात आजही रात्री अपरात्री रस्त्यावरून चालताना किंवा घरी परताना चोर, लुटारू, दारूडे आणि भटक्या कुत्र्यांची भिती वाटते. रस्त्यावरून रात्री उशीरा किंवा पहाटे चालताना कुठून कुत्री भुंकतील व आपल्या दिशेने धावत येऊन हल्ला करतील याची शाश्वती नसते.

रस्त्यावर भुंकणारे कुत्रे कधी एकटे नसते तर त्याच्या आजुबाजुला त्याच्या सवंगड्यांची फौज असते. एकट्या मुलावर किंवा महिलेवर हल्ला करून त्यांचा चावा घेणाऱ्या भटक्या कुत्र्यांचे अनेक व्हिडिओ गेल्या काही दिवसांत सोशल मिडियावर व्हायरल झाले आहेत. पण आपल्या देशात श्वानप्रेमींची संख्याही खूप मोठी आहे.

पाळलेल्या कुत्र्याला ते घरातील मुलाप्रमाणे संभाळतात पण रस्त्यावरच्या त्या मुक्या प्राण्याबद्दलही त्यांना मोठी सहानभुती असते. म्हणनूच रोज सकाळी त्यांना रस्त्यावर जाऊन दूध- बिस्किट देणाऱ्यांची संख्याही मोठी आहे. रस्त्यावरील भटक्या कुत्र्यांना श्वानप्रेमी खायला प्यायला देतात पण त्यांची जबाबदारी मात्र घेण्याचे टाळतात. एवढेच नव्हे तर त्यांना पकडण्यासाठी आलेल्या पथकाला काही विरोधही करतात.

राजधानी दिल्लीत भटक्या कुत्र्यांची समस्या खूप वाढली आहे. यावर्षी जानेवारी ते जून या सहा महिन्यात दिल्लीतील ६५ हजार भटक्या कुत्र्यांची नसबंदी करण्यात आली. दिल्लीप्रमाणे महाराष्ट्रात मुंबई, ठाणे, कल्याण, डोंबिवली, वसई, विरार, पनवेल, उरण, अंबरनाथ, बदलापर, नवी मुंबईतही भटक्या कुत्र्यांनी उच्छाद मांडला आहे.

मुंबईच्या उपनगरात उंच निवासी इमारतींच्या परिसरात भटक्या कुत्र्यांचा मोठ्या संख्येने ठिय्या दिसून येतो. कुत्र्यांच्या लोकसंख्येवर नियंत्रण ठेवण्यासाठी नसबंदीची मोहीम गेले कित्येक वर्षे राज्याराज्यांत राबवली जात आहे, पण त्यांची संख्या वेगाने वाढत आहे, हे या मोहीमेचे अपयश आहे.

भटक्या कुत्र्यांपेक्षा माणसाचा जीव महत्वाचा आहे असे सर्वोच्च न्यायालयाला सांगण्याची वेळ येतेच कशाला? श्वानप्रेमींच्या विरोधामुळे आणि पेटा या आंतरराष्ट्रीय संस्थेने दाद मागितल्यामुळे सर्वोच्च न्यायालयाला आपल्या निर्णयात सुधारणा करावी लागली. ११ ऑगस्टला सर्वोच्च न्यायालयाने भटक्या कुत्र्यांना पकडून श्वान आश्रमात ठेवा असा निर्णय दिला होता, तर बावीस ऑगस्टला भटक्या कुत्र्यांवर नसबंदी करा, लसीकरणानंतर त्यांना त्याच जागेवर सोडा असा निकाल दिला. जी कुत्री आक्रमक व धोकादायक आहेत, त्यांना पकडून श्वान आश्रमात ठेवा असेही म्हटले आहे.

रस्त्यावर कुत्र्यांना खायला घालायला मनाई करण्यात आली आहे, कुत्र्यांना खायला घालण्यासाठी ठराविक जागा निर्माण करावी, असे न्यायालयाने म्हटले आहे. पण हा आदेश व्यवहारात कठोर पाळला जाईल का? भटकी कुत्री धोकादायक कोणती हे आता शोधायची नवीन जबाबदारी महापालिकांवर पडली आहे.

परदेशात रस्त्यावर भटकी कुत्री दिसत नाहीत. तिथे भटक्या कुत्र्यांना पकडून निवारा केंद्रात पाठवले जाते मात्र भारतात भटक्या कुत्र्यांना पकडले जाऊ नये यासाठी पेटाने महागडे वकील देऊन सर्वोच्च न्यायालयात दाद मागितली. पेटाचे मुख्यालय अमेरिकेत आहे, तेथे रस्त्यावर भटकी कुत्री दिसत नाहीत. मात्र पेटा भारतात भटक्या कुत्र्यांसाठी न्यायालयात लढते हे अजब आहे.

रेबीज लस मेडिकलमधे खूप महाग असते पण सरकारी इस्पितळात ती मोफत मिळते कारण सरकार ती विकत घेते. कुत्र्यांसाठी लस बनविणाऱ्या जगात १८ कंपन्या आहेत , भारतात एकच कंपनी आहे. जर भटक्या कुत्र्यांची संख्या संपुष्टात आली तर त्यांच्यावर नसबंदी करण्यासाठी लस निर्माण करणाऱ्या कंपन्यांचे काय होईल? नसबंदी करण्यासाठी लस बनिवणाऱ्या कंपन्या, प्रशासनातील हितसंबंधी आणि श्वान प्रेमी आणि पेटासारख्या संस्था यांच्या दबावामुळेच भटक्या कुत्र्यांना देशात अभय मिळत आहे.


१९६६ मधे चेन्नईमधे देशात सर्वप्रथम कुत्र्यांची नसबंदी करणारी तीन केंद्रे सुरू झाली. सन २००१ मधे राष्ट्रीय पातळीवर हा कार्यक्रम राबिवण्यास सुरूवात झाली. इतक्या वर्षात देशात भटक्या कुत्र्यांची संख्या नेमकी किती वाढली आहे? किती कुत्र्यांवर नसबंदी झाली आहे? प्रजोत्पादन किती नियंत्रणाखाली आले आहे? याची निश्चित आकडेवारी आजही उपलब्ध नाही.

गेल्या अकरा वर्षात मुंबईत भटक्या कुत्र्यांची संख्या कित्येक लाखांनी वाढली. या कालावधीत भटक्या कुत्र्यांनी बारा लाखाहून अधिक मुंबईकरांचा चावा घेतला आहे. मुंबई महापालिका भटक्या कुत्र्यांवर नसबंधी मोहीम राबवत असली तरी त्यातून समस्या संपुष्टात येत नाही. सन २००९ ते २०२४ या काळात भटक्या कुत्र्यांवर नियंत्रण ठेवण्यासाठी मुंबई महापालिकेने चोवीस कोटी पेक्षा जास्त खर्च केले आहेत. आपल्या मतदारसंघात भटक्या कुत्र्यांचा सुळसुळाट झालेला आहे, त्यांना आवरा, अशा तक्रारी स्थानिक आमदार व माजी नगरसेवकांकडून वारंवार प्रशासनाकडे केल्या जातात. नवी मुंबईलाही भटक्या कुत्र्यांच्या समस्यांनी ग्रासले आहे. दीघा, ऐरोली, घणसोली या भागात तर भटक्या कुत्र्यांचा वर्षानुवर्षे रस्त्यांवर धुडगूस चालू आहे. रस्त्यावरील भटक्या कुत्र्यांवर नसबंदीची मोहीम प्रभावीपणे राबविणे हाच त्यावर उपाय आहे. भटक्या कुत्र्यांना पकडून कुठे एकत्र ठेवले व त्यांनी एकसाथ भुंकणे सुरू केले तर त्यातून नव्या समस्या सुरू होतील. सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशाची काटेकोर अमलबजावणी करणे ही प्रशासनाची तारेवरची कसरत आहे.

■ ■ ■

# तुझसे नाराज नही जिंदगी हैरान हुं मै...

भारतातील एक कवी, गीतकार, हिंदी चित्रपट दिग्दर्शक, निमार्ते , विविध पुरस्काराने सन्मानित मनोरंजनासह गंभीर विषय हाताळत समाजाला हृदयस्पर्षी प्रबोधन करणारे प्रतिभावान साहित्यीक शब्दांचा जादूगार, भावनांचा शिल्पकार, गुलजार यांचा ९० वा वाढदिवस नुकताच साजरा झाला .



जीवनाच्या प्रत्येक वळणावर एखादी ओळ साथ देते, एखादा शब्द डोळ्यांत पाणी आणतो, तर एखादी प्रतिमा हृदय हलके करून जाते.ही जादू निर्माण करणारे नाव म्हणजेच गुलजार.

गीतकार म्हणून त्यांनी मोरा गोरा अंग लैले... पासून ते जय हो... पर्यंत रसिकांच्या भावना शब्दांत बंदिस्त केल्या. दिग्दर्शक म्हणून कोशिश, आंधी, माचिस, इजाजत अशा अनेक चित्रपटांतून जीवनाचे खोल प्रश्न पडद्यावर आणले. साहित्यिक म्हणून त्यांनी कविता, अनुवाद आणि लघुकथांमधून समाजाला संवेदनशीलतेची नवी दिशा दिली.

'मेरे अपने' मध्ये तरूणांना हिंसक शत्रूपणाचे निरपराधावरील दुष्परिणाम, हिंसा हि वाईटच चा संदेश, ' कोशीश' मध्ये मुक्या-बहिरे प्रेमीयुगुलाचे जिवांची प्रत्यक्ष संसारात येणारे दुःख व होणारी घालमेल.' माचीस' मध्ये अत्याचाराविरुद्ध लढणारी स्त्री, शेक्सपिअरचे नाटकावर आधारित 'अंगुर' मधील विनोदी डबलरोल धमाका, 'आंधी' मधील पतिपत्नीत दुरावानंतर कालांतराने भेटीत उफाळून येणारी पण समाज भितीने अव्यक्त प्रेमाची व्याकुळता इत्यादी मनाला भिडणाऱ्या कलाकृतीचे दर्शन गुलजार यांनी प्रेक्षकांना घडविले.

'मासूम' मधील 'तुझसे नाराज नही जिंदगी हैरान हु मै' या गाण्यातील भाव मानवी मनाशी एकरूप झाल्याशिवाय राहत नाही . गुलजार यांचे प्रत्येक गीत अशा प्रतिमांनी पुरेपूर व हृदयंगम झाले आहे.



गुलजार यांनी चित्रपट क्षेत्राशिवाय साहित्यिक क्षेत्रात कवी कुसुमाग्रज, पु. ल. देशपांडे, विंदा करंदीकर अशा साहित्यकारांचे मराठी काव्य हिंदी, ऊर्दु भाषेत अनुवादित करून वाहवा मिळवली आहे.

सन २०१६ ला पिंपरी (पुणे) येथे आयोजित ८९ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनात त्यांनी आपल्या भाषणात ह्या बाबींचा आवर्जून उल्लेख केला व साहित्यीक क्षेत्रात मिल्टन, शेक्सपिअर ला जसे स्थान दिल्या गेले तसे कालिदासाच्या रचनांची दखल न घेतल्याबद्दल खंतही व्यक्त केली.

अशा ह्या हर हुन्नरी महान साहित्यिकास चित्रपटातील पटकथा, गीते, निर्मिती, दिग्दर्शकाचे कलाकृतीसाठी अनेक फिल्म फेअर अवार्ड १९७७, २०११, २०१३, २०१९ ला विविध चित्रपटासाठी आतापर्यंत एकुण ३६ पुरस्कार मिळालेला हा एकमेव कलावंत.

सन २००४ ला भारतातील सर्वोच्च ' पद्मभुषण ' सह सन २००७ ला हॉलीवुड फिल्म ऑस्कर पुरस्कार 'जय हो' या स्लमडॉग मिलेनिअर या गीताच्या लेखनासाठी ग्रॅमी अवार्ड तर सन २०१३ ला दादासाहेब फाळके हा सिने सृष्टीतील सर्वोच्च पुरस्काराने गौरवण्यात आले आहे.

लोकांना मेल्यानंतर वाचलं जात, पण गुलजार यांनी प्रत्येक भावनेला न्याय देऊन स्वतःच्या अंतरंगात पाहायला लोकांना शिकवलं.

या बहुआयामी कलाकाराचा ९ दशकांचा प्रदीर्घ प्रवास, असंख्य सन्मान, अमाप लोकप्रियता आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे रसिकांच्या हृदयात मिळवलेले स्थान, हेच त्यांचे खरे यश.

वा. पां. जाधव
अमरावती

गुलजार म्हणजे शब्दांत मावलेला निसर्ग, सुरांत दडलेली व्याकुळता, कवितेत उमललेले प्रेम, आणि पडद्यावर साकारलेले वास्तव. त्यांची प्रत्येक कलाकृती मनाला नवा विचार, नवा अनुभव आणि नवी दिशा देत राहते. त्यांची लेखणी असाच सुवर्ण प्रवाह वाहत राहो, आणि आपल्याला भावविश्व अधिक समृद्ध करत राहो. या अनमोल कलाकारास शुभेच्छा.....

■ ■ ■

## भ्रष्टाचार मुक्त व पारदर्शक क्रीडाक्षेत्र

वाचक लिहितात

आंतरराष्ट्रीय खेळांच्या स्पर्धांमध्ये एकल क्रीडा प्रकाराला डिसिप्लिन असे म्हणतात. डिसिप्लिन या इंग्रजी शब्दाचा अर्थ शिस्त असा आहे म्हणूनच खेळात शिस्त, संघ भावना, एकात्मता, देशाभिमान व शारीरिक, मानसिक तंदुरुस्ती मिळते.

ऑनलाइन गेम मुळे हे सर्व नष्ट होत चालले आहे त्याच्यावर नियंत्रण आणणे आणि प्रत्येकाला मेहनत करून उत्कृष्ट खेळाडू बनविणे हे काम सरकारचे आहे व सरकार त्या प्रमाणे काम करत आहे. याचाच एक भाग म्हणून देशांतर्गत विविध ठिकाणी खेलो इंडिया च्या नावाने विविध खेळांच्या स्पर्धा घेण्यात येत आहे.

त्याचा परिणाम असा आहे की आज अनेक खेळाडू लहान मोठ्या शहरातून पुढे येऊन ऑलिंपिक, राष्ट्रीय,आंतरराष्ट्रीय क्रीडा स्पर्धांमध्ये सहभागी होऊन देशासाठी पदक मिळवत आहे.

गेल्या काही वर्षांपासून क्रीडाक्षेत्र पैसे कमविण्याचे एक महत्त्वाचे साधन झाले असल्याचे क्रिकेटमधील आय.पी.एल व कबड्डीतील प्रो लीग्स मधून दिसून येते. त्यामुळेच अनेक राजकारणी क्रीडा क्षेत्रात आले आहेत. पैशापासून सत्ता आणि सत्तेपासून पैसा कमावणे हेच ज्यांचे ध्येय असते असे राजकारणी लोक विविध क्रीडा संस्थांच्या माध्यमातून पैसे कमावून भ्रष्टाचार करत आहे.

जो पैसा देईल त्या खेळाडूची निवड भारतीय संघात निवड केली जाते त्यावेळी त्याचे खेळातील कौशल्य पाहिले जात नाही. तसेच क्षेत्रीय आरक्षणाच्या मुळे गावागावातील उत्कृष्ट खेळाडू हे पुढे येत नाही.

क्रीडा क्षेत्रात होणारा भ्रष्टाचार, गैरव्यवहार, खेळ आणि खेळाडू यात केले जाणारे राजकारण, अफरातफर या पार्श्वभूमीवर केंद्र शासनाने राष्ट्रीय क्रीडा प्रशासन अधिनियम २०२५ लागू केला आहे.

या विधेयकातील प्रावधानानुसार सर्व क्रीडा महासंघांना त्यांचा आर्थिक हिशोब तसेच निवड प्रक्रिया आदी गोष्टी सार्वजनिक कराव्या लागणार आहे. केवळ खेळ आणि पैसा कमावणे यासाठी नव्हे तर खेळाडूंच्या कल्याणासाठी विचार करावा लागणार आहे. त्या अनुषंगाने काही प्रावधान ने बंधनकारक आहे. क्रीडा क्षेत्रातील संघटनांवर देखरेख ठेवण्यात येईल.

क्रीडा क्षेत्रातील गैरप्रकार उदाहरणार्थ डोपिंग, मॅच फिक्सिंग छळवणूक किंवा लैंगिक शोषण करणाऱ्यांवर कठोर कारवाई करता येईल. महिला आणि अपंग खेळाडूंसाठी विशेष प्राधान्य दिले आहे.

या सवार्मुळे क्रीडाक्षेत्र पारदर्शक होईल कारण त्याच्याशी संलग्न असलेल्या संस्थांचा स्वतंत्र कारभार संपला असून त्यांना सरकारच्या नियंत्रणात राहावे लागणार आहे. निवड प्रक्रियेतील भ्रष्टाचार थांबून प्रतिभावंत आणि खेळाडू नाव कमविण्याची संधी मिळेल. या विधेयकामुळे क्रीडा प्रशासनात पारदर्शकता व निष्पक्षता येईल.

राष्ट्रीय क्रीडा निवडणूक पॅनल, आचारसंहिता, सुरक्षित क्रीडा धोरण आणि तक्रार निवारण यंत्रणेत सर्व भागधारकांचे म्हणणे ऐकले जाईल तसेच त्यांचा आदर केला जाईल. वर्ष २०३६ मध्ये भारतात ऑलिंपिक स्पर्धेचे आयोजन करण्याचा विचार आहे या विधेयकाच्या साह्याने ते स्वप्न पूर्ण होऊ शकते.

■ लीना मकरंद गाडगीळ
पनवेल.



# चपातीला तूप लावून खाल्ल्याने बरे होतात अनेक आजार

अनेकांना तूप आवडतं. डाळ-भातावर तूप घालून खायला आवडतं तर काहींनी चपातीला किंवा रोटीला तूप लावून खायला आवडतं. पण तूप-रोटी किंवा चपाती खाणे हे आरोग्याच्या दृष्टीने गुणकारी मानलं जातं. आजकाल जेव्हा प्रत्येकजण फिटनेस आणि डाएटिंगचा विचार करताना दिसतो. पण अवनेकांच्या डाएटमध्ये तूप हे असतंच असतं. पण रोज तूप घालून रोटी खाणे खरोखर आरोग्यदायी आहे का?

**तूप आणि चपाती खाल्ल्याने कोणते आजार बरे होतात?**

**१. पचन सुधारते :** तूप पचनसंस्था सुधारते. जेव्हा तुपासोबत रोटी खाता तेव्हा रोटीतील फायबर आणि कार्बोहायड्रेट्स सहज पचतात. त्यामुळे पोट हलके राहते आणि बद्धकोष्ठतेची समस्या दूर होते.

**२. शरीराला त्वरित ऊर्जा देते**

तुपामध्ये असलेले चांगले फॅट्स आणि ओमेगा-३ फॅटी ॲसिड शरीराला त्वरित ऊर्जा देतात. कधीकाळी शेतकरी आणि मजूर सकाळी तूप लावून भाकरी खाऊन दिवसभर काम करायचे

**३. मेंदू आणि त्वचेसाठी फायदेशीर :** तुपामध्ये असलेले जीवनसत्त्वे अ, ड, ई आणि के मेंदूची वाढ, दृष्टी, त्वचेची चमक आणि केसांची ताकद वाढवतात. तुमच्या आहारात त्यांचा समावेश केल्याने तुम्हाला एकाच वेळी एकच नाही तर अनेक फायदे मिळतात.

**४. वजन नियंत्रणात उपयुक्त :** योग्य प्रमाणात तूप खाल्ल्याने चयापचय वाढते. चयापचय चांगले असताना शरीरात चरबी साठत नाही आणि वजनही नियंत्रणात राहते. योग्य प्रमाणात तूप सेवन केल्यास लठ्ठपणासारख्या समस्या उद्भवत नाहीत.

**५. हृदयाचे आरोग्य सुधारते :** जर तुम्ही शुद्ध देशी गायीचे तूप खाल्ले तर ते तुमच्या हृदयासाठी फायदेशीर ठरू शकते. त्यात असलेले उछअ (कंजुगेटेड लिनोलिक ॲसिड) रक्तदाब आणि कोलेस्टेरॉलची पातळी नियंत्रित करण्यास मदत करते.

**६. रोगप्रतिकारक शक्ती वाढवते :** तुपामध्ये असलेले अँटीऑक्सिडंट्स शरीराची रोगप्रतिकारक शक्ती वाढवतात. नियमित तुपाच्या सेवनाने आजार दूर राहतात आणि शरीर मजबूत होते. यामुळे अनेक आजार शरीरापासून दूर राहतात.

**तूप खाताना काय काळजी घ्यावी?**

जर शारीरिक हालचाल कमी असेल आणि तुम्ही जास्त तूप खाल्ले तर वजन वाढणे निश्चित आहे. तूपात कॅलरीज जास्त असतात ज्यामुळे चरबी वाढते. जास्त तूप खाल्ल्याने रक्तातील वाईट कोलेस्टेरॉल वाढू शकते, ज्यामुळे हृदयविकाराचा झटका आणि स्ट्रोकचा धोका वाढतो. मधुमेह आणि रक्तदाबाच्या रुग्णांनी मर्यादित प्रमाणात तूप सेवन करावे, अन्यथा आरोग्याच्या समस्या वाढू शकतात.

■ ■ ■

## अशोकायन

प्रा. अशोक सारडा
मेहकर
(९४२१३९४३३९)



### शेगावीचा राणा

नि:स्वार्थ श्रध्देने जो
होतो श्री चरणी लीन
त्यांची इडापिडा टाळण्या
तत्पर संत गजानन राणा ..!

समाधिस्त झाले जरी
भाविकांना येते प्रचीती
उगीच का संत नगरीला
होते भक्तांची तोबा गर्दी ?

अध्यात्म विज्ञान सेवेचा
अप्रतिम संगम आहे इथे
असे निष्कलंक संस्थान
जगात आहे कां कुठे?

# जामली ते ढाकना रस्त्याची दुरावस्था

## खड्डयांनी रस्त्याची वाट लावली; पाण्यामुळे प्रवास धोकादायक



**महासागर प्रतिनिधी**

**चुरणी, (दि. 29)** – मेळघाटातील रस्त्यांची अवस्था दिवसेंदिवस बिकट होत असून धामणगाव गढीवरून जामली मार्गे धारणी जाणाऱ्या रस्त्याची स्थिती अत्यंत गंभीर झाली आहे. जागोजागी मोठमोठे खड्डे पडले असून पावसाचे पाणी रस्त्यावरून वाहत आहे. त्यामुळे वाहनधारक व प्रवाशांना जीव मुठीत धरून प्रवास करावा लागत आहे.

धामणगाव गढी ते ढाकना या सुमारे 50 किमी रस्त्यात 30 किमीचा भाग व्याघ्रप्रकल्पातील अतिसंरक्षित जंगलातून जातो. या



जंगलातील रस्ता सर्वाधिक खराब असून हजारो खड्डयांमुळे अपघाताची शक्यता वाढली आहे. शिवाय लहान नाल्यांवर ठिकठिकाणी रपटे असून योग्य पूल नसल्याने पाणी पार करताना अपघाताची भीती कायम असते. पावसाळ्यात या रस्त्यावरून प्रवास करणे अक्षरशः जीवघेणे ठरते.

ढाकना, सावऱ्या, खोंगडा, गिरगुटी, अंबापाटी, जामली, चीचखेडा, कुलंगना खुर्द आदी जवळपास 50 गावांतील नागरिक या रस्त्यावरून प्रवास करतात. तसेच व्याघ्रप्रकल्पातील वाघ, चित्ता, अस्वल यांसारख्या जंगली प्राण्यांच्या हालचालींमुळे प्रवाशांच्या भीतीत भर पडली आहे.

दररोज धारणीला कामानिमित्त जाणाऱ्या नागरिकांसह परतवाडा–ढाकना मार्गावरील प्रवाशांना या रस्त्यामुळे त्रास सहन करावा लागत असल्याने सार्वजनिक बांधकाम विभाग अचलपूर तसेच स्थानिक आमदार–खासदार यांनी तातडीने रस्त्याच्या दुरुस्तीची कामे हाती घ्यावी, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.



### पीडब्ल्यूडीचे स्पष्टीकरण

सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत अनेक कामे झालेली असून त्यांची बिले थकीत आहेत. मात्र पावसाळ्यामुळे रस्त्यांची अवस्था खराब झाली आहे. पावसाळा संपल्यानंतर रस्त्याच्या दुरुस्तीची कामे सुरू केली जातील, असे कार्यकारी अभियंता प्रमोद वानखडे यांनी सांगितले.

### स्थानिकांचा इशारा

धामणगाव गढी–जामली–धारणी रस्त्याची अवस्था अत्यंत वाईट आहे. खड्डयांमुळे दररोज अपघात होत आहेत. वारंवार पत्रव्यवहार करूनही रस्त्याची दुरुस्ती होत नसेल, तर मेळघाटातील जनता रस्त्यावर उतरून आंदोलन करेल, असा इशारा कुलंगना खुर्दचे उपसरपंच शंकर घोरे व सरपंच संघटनेचे अध्यक्ष मोहन अजनेरिया यांनी दिला.

# गुरुकुल शाळेच्या अतिक्रमण प्रकरणात प्रशासनाचा ढिम्म कारभार

## शेतकऱ्यांमध्ये संताप उसळला | आंदोलनाचा इशारा

**महासागर प्रतिनिधी**

**अचलपूर, (दि. 29)**– अचलपूर–परतवाडा रोडवरील गुरुकुल या खाजगी शाळेने बिच्छन नदीच्या पात्रात भराव टाकून अतिक्रमण केले आहे. याविरोधात शेतकऱ्यांनी एक वर्षापूर्वीच उपविभागीय अधिकाऱ्यांकडे तक्रार दाखल केली होती. परंतु तब्बल 12 महिने उलटूनही प्रशासनाकडून कोणतीही कारवाई न झाल्याने शेतकऱ्यांमध्ये संतापाची लाट उसळली

शेतकऱ्यांच्या म्हणण्यानुसार, सुमारे 80 ते 100 फूट रुंद आणि 200 ते 250 फूट लांबीच्या नदीपात्रावर भराव टाकून अतिक्रमण करण्यात आले आहे. हे काम नगर परिषदेकडून फ्लड झोन म्हणून चिन्हांकित भागातच झाले असल्याचा आरोप करण्यात आला आहे.

या अतिक्रमणामुळे नदीचा प्रवाह डावीकडून उजवीकडे वळला असून शेतात जाणारा रस्ता पूर्णपणे बंद झाला आहे. त्यामुळे शेतीकामावर थेट परिणाम झाला असून, पूरस्थिती आली तर गंभीर संकट निर्माण होईल, अशी भीती व्यक्त होत आहे. शेतकऱ्यांनी तक्रार दिल्यानंतर पाहणीसाठी पथक न पाठवता प्रशासनाने या प्रकरणाकडे दुर्लक्ष केल्याचा आरोप आहे. तक्रारीची प्रत जिल्ह्याचे पालकमंत्री, तत्कालीन आमदार बच्चुभाऊ कडू, जिल्हाधिकारी, नगर परिषद मुख्याधिकारी, जलसंपदा विभाग आणि अचलपूर पोलिस ठाण्याकडेही पाठवण्यात आली होती. तरीदेखील कुठलीही कारवाई झाली नाही. शेतकऱ्यांनी स्पष्ट केले की, तातडीने अतिक्रमण हटवून नदीचे मूळ स्वरूप कायम ठेवले नाही तर आम्हाला तीव्र आंदोलन करावे लागेल. अशी भूमिका मिलींद झाडे, रमण भोपने, विनय सालपुर, अतुल आवनकर, संजय श्रावनपुर, विजय पोटे आदी शेतकऱ्यांनी घेतली आहे.



> एक वर्ष पूर्वीपासून तक्रार दिली आहे. तरीही कारवाई झालेली नाही. अतिक्रमणामुळे नदीचा प्रवाह बदलला असून शेतात जाण्याचा रस्ता बाधित झाला आहे.
>
> **आशुतोष झाडे, शेतकरी अचलपूर**

> डी.पी. रोड गहाळ करून शेतकऱ्यांना जाणे–येणे कठीण झाले आहे. गर परिषद मात्र मौन बाळगून आहे.
>
> **बंटी केजडीवाल, पदाधिकारी युवा स्वाभिमान, अचलपूर**

# कल्पकतेतून साकारली संत नगरी



## राठी कुटूंबियांनी उभारला शेगाविचा देखावा

**महासागर प्रतिनिधी**

**दर्यापूर, (दि. 29)**– गणेशोत्सव सध्या मोठ्या उत्साहात साजरा होत आहे. याच उत्सवाच्या पार्श्वभूमीवर दर्यापूरातील राठीपुरा येथे वास्तव्यास असणारे प्रवीण राठी आणि मीनल राठी या दाम्पत्याने आपल्या घरात एक विशेष आणि अभिनव देखावा साकारला आहे. त्यांनी शेगाव नगरी व संत गजानन महाराज यांच्या तब्बल 21 अध्यायांचे दर्शन घडवून भक्तांना आध्यात्मिक अनुभव देण्याचा प्रयत्न केला आहे. या देखाव्यात संत गजानन महाराजांचा संपूर्ण जीवनपट उभा करण्यात आला आहे. विशेष म्हणजे या निर्मितीसाठी प्लास्टिक वस्तूंचा वापर करून सुंदर आणि आकर्षक रचना करण्यात आली आहे. या उपक्रमासाठी दाम्पत्याने तब्बल आठ दिवस परिभम घेतले असल्याची माहिती त्यांनी दिली. प्रवीण आणि मीनल राठी यांना दरवर्षी गणेशोत्सवात वेगवेगळ्या थीमवर देखावा साकारण्याची परंपरा आहे. आतापर्यंत त्यांनी जंगल थीम, नारळी पौर्णिमा थीम, केदारनाथ दर्शन, अष्टविनायक दर्शन अशा विषयांवर भव्य देखावे साकारले आहेत. यावर्षी मात्र त्यांनी श्रद्धा आणि भक्ती यांचा संगम घडवणाऱ्या शेगाव नगरीची निवड केली. दर्यापूर शहरात या देखाव्याची चर्चा रंगली असून अनेक भक्त तसेच नागरिक या ठिकाणी संत गजानन महाराजांच्या जीवनप्रवासाचे दर्शन घेण्यासाठी दाखल होत आहेत. समाजात सकारात्मक संदेश देणारा हा उपक्रम सर्व स्तरातून कौतुकास्पद आहे.

> गणेशोत्सव हा आनंद, श्रद्धा आणि संस्कृती यांचा मिलाफ आहे. दरवर्षी आम्ही वेगवेगळ्या थीमवर देखावा साकारतो. यावर्षी संत गजानन महाराजांचा जीवनपट सादर करून भक्तांना आध्यात्मिक अनुभव देण्याचा प्रयत्न केला आहे.
>
> **प्रवीण राठी, दर्यापूर.**

# ठाणेदार बदलले, पण अवैध धंदे सुरूच!

## चांदूर बाजार पोलीस स्टेशनचा कारभार ढेपाळला

**महासागर प्रतिनिधी**

**चांदूर बाजार, (दि. 29)** – चांदूरबाजार पोलीस ठाण्याच्या हद्दीत मोठ्या प्रमाणावर अवैध धंदे सुरू असून, यावर पोलीस प्रशासनाने कारवाई करण्यात कसूर केल्याचे दिसत आहे. नुकतेच अशोक जाधव यांची पुन्हा एकदा ठाणेदार म्हणून नियुक्ती झाली आहे. परंतु त्यांच्या येण्यापासून चोरीसारख्या घटनांत वाढ झाल्याची चर्चा स्थानिक पातळीवर आहे.

पूर्वीही साईनगरी येथील प्रकरणात ठाणेदार जाधव यांचे नाव चर्चेत आले होते. अशा पार्श्वभूमीवर त्यांची पुन्हा चांदूरबाजार येथे नेमणूक झाल्याने नागरिक आश्चर्य व्यक्त करत आहेत. सामान्य व्यापाऱ्यांना रात्री दहा नंतर दुकाने बंद ठेवण्याचे आदेश दिले असतानाच दुसरीकडे मात्र अवैध वाळू तस्करी, गुटखा वाहतूक, गोवंश तस्करी यांसारखे



धंदे रात्री बेरात्री सुरूच आहेत. या सर्वांवर ठोस कारवाई होत नसल्याने ठाणेदारांच्या भूमिकेबाबत प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. यामुळे नागरिकांमध्ये नाराजीचे वातावरण असून, सामान्यांवर कठोर कारवाई आणि अवैध धंदे करणाऱ्यांकडे दुर्लक्ष हीच का पोलीसांची भूमिका? असा सवाल लोकवर्गातून उपस्थित केला जात आहे. सध्या तरी ठाणेदारांनी अशा कोणत्याही अवैध धंद्यांविरोधात मोहीम राबवलेली नाही. उलट अवैध धंदे करणाऱ्यांचे धाडस दिवसेंदिवस वाढताना दिसत आहे. या परिस्थितीमुळे अवैध धंदे सुसाट, पोलीस शांत असेच चित्र स्पष्ट होते. नागरिकांचे म्हणणे आहे की, जर पोलीसांनी यावर गांभीर्याने पावले उचलली नाहीत, तर गुन्हेगारीला आणखी चालना मिळेल. आता हे सर्व प्रकार वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या लक्षात येतात का, आणि त्यावर काही ठोस कारवाई होते का, हे पाहणे महत्त्वाचे ठरेल.

# वरुडमध्ये गुंजणार 'स्वर विदर्भाचा'

## विदर्भस्तरीय भव्य खुली गीतगायन स्पर्धा

**महासागर प्रतिनिधी**

**वरुड, (दि. 29)** – स्व. वामनराव केशवराव देशपांडे कला व क्रीडा अकादमी, पांढरघाटी, शाळा व्यवस्थापन समिती पांढरघाटी आणि सूरसंगम टीचर्स म्युझीकल ग्रुप, वरुड यांच्या संयुक्त विद्यमाने 'स्वर विदर्भाचा' या विदर्भस्तरीय भव्य खुल्या गीतगायन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे.

ही स्पर्धा विदर्भातील नवोदित गायक–गायिकांना व्यासपीठ उपलब्ध करून देणार असून विजेत्यांसाठी



आकर्षक रोख बक्षिसांची सोय करण्यात आली आहे. प्रथम बक्षीस 15 हजार, द्वितीय 10 हजार, तृतीय 5 हजार तसेच प्रोत्साहनपर 2 हजारांची तीन व एक हजारांची पाच बक्षिसे ठेवण्यात आली आहेत.

ऑडिशन राऊंडची पहिली फेरी शनिवार, 30 ऑगस्ट रोजी सकाळी 9 वाजता, तर दुसरी फेरी त्याच दिवशी दुपारी 3 वाजता येथील अष्टविनायक सभागृह येथे होईल. ऑनलाइन नोंदणीची शेवटची तारीख 29 ऑगस्ट असून नोंदणी केलेल्या स्पर्धकांना प्राधान्य दिले जाईल. ही स्पर्धा आठ वर्षांवरील सर्व वयोगटांसाठी खुली असून प्रत्येक स्पर्धकाला सहभागाचे प्रमाणपत्र दिले जाणार आहे. ऑडिशनमधून निवड झालेल्या टॉप 25 स्पर्धकांची अंतिम फेरी गुरुवार, 4 सप्टेंबर रोजी सकाळी 11 वाजता होणार आहे. या वेळी विजेत्यांचा सत्कार व बक्षिस वितरण विदर्भातील मान्यवरांच्या उपस्थितीत होईल. स्पर्धेच्या आयोजनात अकादमीचे अध्यक्ष नामदेव सानप यांच्यासह समिती सदस्य परिश्रम घेत आहेत.

# श्री दिगंबर जैन मंदिराची भिंत कोसळली

**महासागर प्रतिनिधी**

**अचलपूर, (दि. 29)** गुरुवारी दुपारी सुमारे 4 वाजताच्या सुमारास झालेल्या मुसळधार पावसामुळे शहरातील टक्कर चौक येथील ऐतिहासिक श्री दिगंबर जैन मंदिराची भिंत कोसळली. या घटनेमुळे परिसरात मोठी खळबळ उडाली. सुदैवाने कोणतीही जीवितहानी झाली नाही. पावसाच्या पाण्याने मंदिराचे पुजारी अरुण प्रभाकर कहाते यांच्या घरात पाणी शिरले. त्यामुळे घरगुती साहित्याचे मोठे नुकसान झाले आहे. अचानक आलेल्या मुसळधार पावसामुळे शहरातील अनेक भागांत पाणी साचून नागरिकांना त्रास सहन करावा लागत आहे. भिंत कोसळल्याने



मंदिर परिसर धोकादायक झाला असून, स्थानिक नागरिकांनी प्रशासनाने तातडीने पाहणी करून दुरुस्तीची कामे करावीत, अशी मागणी केली आहे. याचबरोबर शहरातील जिर्णावस्थेतील घरांची तपासणी करून आवश्यक उपाययोजना कराव्यात, अशीही अपेक्षा नागरिकांनी व्यक्त केली. स्थानिक नागरिकांचे म्हणणे आहे की, प्रशासनाने वेळेत उपाययोजना केल्या नाहीत तर अशा प्रकारच्या दुर्घटना पुन्हा होऊ शकतात. त्यामुळे तातडीने कारवाई करून सुरक्षितता सुनिश्चित करावी, अशी मागणी होत आहे.

# राजकमल उड्डाण पुल प्रकरणी युवक काँग्रेस आक्रमक

## पालकमंत्र्यांना निवेदन देऊन भूमिकेची मागणी

## 240 कोटींचा प्रस्ताव रखडला, स्ट्रक्चर ऑडिटवरही प्रश्नचिन्ह

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, (दि. 29)** शहराच्या वाहतूक व्यवस्थेची जीवनवाहिनी मानला जाणारा राजकमल रेल्वे उड्डाण पूल सार्वजनिक बांधकाम विभाग आणि पोलीस प्रशासनाने 24 ऑगस्ट 2025 च्या मध्यरात्री कडेकोट बंद केला. या निर्णयामुळे ऐन हिंदू उत्सवाच्या काळात अमरावतीतील सुमारे 10 लाख नागरिक अडचणीत आले आहेत. याबाबत कोणतीही पूर्वसूचना न देता हा निर्णय घेतल्याने नागरिक आणि विविध संघटनांत संताप व्यक्त होत आहे. रुग्णवाहिका चालक



संघटना, व्यापारी संघटना, शैक्षणिक संस्था, ऑटो युनियन, एस.टी. महामंडळ यांना विश्वासात न घेता पूल बंद केल्याने शहरातील वाहतुकीवर गंभीर परिणाम झाला आहे. या पार्श्वभूमीवर युवक काँग्रेसने पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांना निवेदन दिले.

युवक काँग्रेसचे म्हणणे आहे की, सन 2023 मध्ये राजकमल उड्डाण पुलाच्या दुरुस्तीकरिता 240 कोटी रुपयांचा प्रस्ताव शासनाकडे पाठविला होता. मात्र त्यावर आजतागायत कोणतीही दखल घेण्यात आली नाही. दरम्यान, पुलाच्या सौंदर्यीकरणासाठी लाखो रुपये खर्च करण्यात आले. तसेच स्ट्रक्चर ऑडिटसाठी खासगी अभियांत्रिकी महाविद्यालयाची निवड का करण्यात आली, हा सवालही निवेदनात उपस्थित करण्यात आला आहे. जर पुल धोकादायक स्थितीत असेल तर रेल्वे विभाग आपला वाहतूक मार्ग का बंद करत नाही? स्ट्रक्चर ऑडिट रेल्वेकडून झाले आहे का? असा प्रश्न युवक काँग्रेसने उपस्थित केला आहे. युवक काँग्रेसने मागणी केली आहे की, राजकमल पुलाच्या पुनर्निर्माणासाठी शासनाकडून मंजुरी व निधी किती दिवसांत मिळणार, तसेच कामाच्या निविदा प्रक्रिया व डेडलाईन जाहीर करण्यात यावी. हे निवेदन युवक काँग्रेस शहराध्यक्ष वैभव देशमुख यांच्या नेतृत्वाखाली देण्यात आले. यावेळी मुन्ना राठोड, समिर जवंजाळ, अनिकेत ढेंगळे, सागर कलाने, आशिष यादव, संकेत साहू, शुभम बांबल, श्रेयस धर्माळे, धनंजय बोबडे आदी कार्यकर्ते उपस्थित होते.

# सततच्या पावसामुळे शेतकऱ्यांचे प्रचंड नुकसान

## तहसीलदारांना तालुका काँग्रेस कमिटीचे निवेदन

## फळबागांसह पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान

## पंचनामे करून तातडीने मदत देण्याची मागणी

**महासागर प्रतिनिधी**

**धामणगाव रेल्वे, (दि. 29)** –धामणगाव तालुक्यातील शेतकऱ्यांचे सततच्या पावसामुळे प्रचंड नुकसान झाले असून, याबाबत तालुका काँग्रेस कमिटी व शेतकऱ्यांच्या वतीने तहसीलदारांना



निवेदन देण्यात आले.

सोयाबीन, तुर, कपाशी, संत्रा, मोसंबी आदी पिकांचे मोठे नुकसान झाले आहे. नाले व बंधारे फुटल्याने बांधे वाहून गेले, विहिरी खचल्या, तर अनेक ठिकाणी जमीन खरडून गेल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले. संत्रा व मोसंबी फळबागांमध्ये मोठ्या प्रमाणावर फळगळ होत असल्याने हेक्टरी किमान 1 लाख रुपयांची मदत द्यावी, अशी मागणी करण्यात आली. तसेच विरुळ–रोंघे शिवार ते अंजनसिंगी शिवारापर्यंत विदर्भ नदीचे खोलीकरण व रुंदीकरण करण्याची मागणीही करण्यात आली.

उन्हाळ्यात चुकीच्या पद्धतीने उभारलेल्या कोल्हापुरी बंधाऱ्यामुळे हजारो हेक्टर शेतीचे नुकसान झाल्याचे सांगून, संबंधित यंत्रणेवर कारवाई करावी अशी मागणी करण्यात आली. तालुका काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष पंकज वानखडे म्हणाले, शेतकऱ्यांचे बांधे वाहून गेले, फळबागा उद्ध्वस्त झाल्या, जमिनी खरडून गेल्या आहेत. शासनाने तातडीने पंचनामे करून मदत न दिल्यास काँग्रेस पक्ष रस्त्यावर उतरेल. या प्रसंगी काँग्रेस पदाधिकारी, कार्यकर्ते व शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.


# चांदूर बाजार तालुक्यात आत्महत्यांचे सावट

## दोन महिन्यात चार शेतकऱ्यांचे बळी

## कर्जमाफी अद्यापही चर्चेतच

**महासागर प्रतिनिधी**

**चांदूर बाजार, (दि. 29)** – तालुक्यात शेतकऱ्यांच्या आत्महत्यांचा प्रश्न दिवसेंदिवस गंभीर होत आहे. केवळ जुलै आणि ऑगस्ट महिन्यात चार शेतकऱ्यांनी आत्महत्या करून जीवन संपवले. यातील दोन घटना 25 ऑगस्ट रोजी घडल्या असून परिसरात हळहळ व्यक्त होत आहे. शासनाकडून ठोस कर्जमाफीचा निर्णय अद्यापही झालेला नाही.



### 25 ऑगस्ट रोजी दोन आत्महत्या

खराडा येथील ज्ञानेश्वराव लालाजी चौधरी (62) या कर्जबाजारी शेतकऱ्याने आत्महत्या केली. त्यांच्याकडे दोन एकर कोरडवाहू शेती असून कर्जाच्या डोंगराखाली दबलेल्या या शेतकऱ्याने जीवन संपवले. त्याच दिवशी शिरसगाव कसबा येथील रोशन बाळकृष्णराव बदुकले (32) यांनीही आत्महत्या केली. त्यांच्या नावावर केवळ दोन एकर शेती असून बँक ऑफ महाराष्ट्रचे थकित कर्ज होते.

### आर्थिक संकट आणि गैरव्यवस्था

विदर्भातील शेतकऱ्यांचे संकट मागील काही वर्षांपासून वाढले आहे. यावर्षीही अयोग्य हवामान, अपुरा पाऊस, महागडी बियाणं–खतं, पीक विमा यातील गैरव्यवस्था आणि सावकार–बँकांचा दबाव या कारणांमुळे शेतकरी आत्महत्येकडे ढकलले जात आहेत.

### आत्महत्या हा फक्त आर्थिक प्रश्न नाही

शेतकऱ्यांच्या आत्महत्या हा आता केवळ आर्थिक प्रश्न न राहता सामाजिक व मानसिक आरोग्याशी संबंधित मुद्दा ठरला आहे. तातडीने कर्जमाफी, पारदर्शक प्रक्रिया आणि प्रत्यक्ष मदतीची अंमलबजावणी न झाल्यास शेतकऱ्यांचे मृत्यू वाढण्याची भीती व्यक्त होत आहे.

### समितीवर शंका

दरम्यान, अमरावती जिल्ह्याचे पालकमंत्री व महसूल मंत्री यांनी कर्जमाफीसाठी समिती स्थापन करण्याची घोषणा केली आहे. मात्र या समितीचे प्रत्यक्ष काम कधी सुरू होईल, मदत कधी मिळेल हे अद्याप स्पष्ट नाही. सरकार फक्त घोषणा करते, मदत मात्र शेतकऱ्यांपर्यंत पोहोचत नाही, अशी टीका शेतकरी संघटनांकडून होत आहे.

# आरोपीची जामिनावर सुटका

## ॲड. काठीवाला यांचा दमदार युक्तीवाद

**महासागर प्रतिनिधी**

**वरूड, (दि. 29)** – वरूड येथील सुप्रसिद्ध ॲड. एम. जी. काठीवाला व त्यांच्या सहकाऱ्यांच्या युक्तीवादामुळे सावंगा येथील घनश्यामकुमार आंडे यांना उच्च न्यायालयाकडून मोठा दिलासा मिळाला आहे.

आरोपीस स्थानिक न्यायालयाने कलम 294 (सार्वजनिक ठिकाणी अश्लील वर्तन किंवा शिवीगाळ करणे) व कलम 506 (धमकी देणे किंवा भय दाखवणे) या अंतर्गत दोषी ठरवत शिक्षा



सुनावली होती. ही शिक्षा जिल्हा न्यायालयानेही कायम ठेवली होती. मात्र या निर्णयाला आव्हान देत ॲड. काठीवाला यांच्यासह ॲड. आर. ए. बागडे व ॲड. एन. एम. नंदाने यांनी उच्च न्यायालयात दमदार युक्तीवाद केला. त्यांच्या मांडणीवर विचार करून न्यायालयाने अखेर आरोपीला जामिनावर सुटकेचा दिलासा दिला.

या निकालामुळे आरोपी व त्यांच्या कुटुंबाला मोठा दिलासा मिळाला असून परिसरात ॲड. काठीवाला व त्यांच्या सहकाऱ्यांचे सर्वत्र कौतुक होत आहे. यापूर्वीही त्यांनी हायकोर्ट व सुप्रीम कोर्टात अनेक महत्त्वाची प्रकरणे यशस्वीरीत्या हाताळून वकिली क्षेत्रात आपली स्वतंत्र छाप निर्माण केली आहे.



# बालांगण

## मोहिमा संरक्षण दलांच्या



**मि**त्रमैत्रिणींनो, आपल्या देशावर संकट आलं की संरक्षण दलं सज्ज होतात. शत्रूचं आव्हान परतवून लावतात. आपलं लष्कर, नौदल आणि हवाई दल विविध मोहिमा राबवतं. या मोहिमांमध्ये आपले धाडसी सैनिक सर्वस्व पणाला लावतात. भारतीय संरक्षण दलांनी आजवर राबवलेल्या अशाच काही मोहिमांविषयी...

▶▶ भारताने कारगिल युद्धात विजय मिळवला. भारताची ही मोहीम ऑपरेशन विजय म्हणून ओळखली जाते. भारतीय क्षेत्रात घुसखोरी केलेल्या पाकिस्तानी सैन्याला परतवून लावण्यासाठी ही मोहीम आखण्यात आली होती. २६ जुलै १९९९ हा दिवस कारगिल विजय दिवस म्हणून साजरा केला जातो.

▶▶ जुलै २०१६ मध्ये दक्षिण सुदानमधल्या अंतर्गत युद्धात ६०० भारतीय अडकून पडले होते. त्यांना यशस्वीपणे सोडवून आणण्यासाठी संकटमोचक ही मोहीम राबवण्यात आली आणि ती यशस्वीही ठरली.

▶▶ उत्तराखंड तसंच हिमाचल प्रदेशमध्ये २०१३ च्या जून महिन्यात पावसाने धुमाकूळ घातला. या पावसात हजारो लोक अडकले होते. या लोकांना वाचवण्यासाठी भारताच्या हवाई दलाने 'ऑपरेशन राहत' ही मोहीम राबवली होती.

**जाणून घ्या**

▶▶ 'हुडहुड' नावाच्या चक्रीवादळाने २०१४ मध्ये आंध्र प्रदेश, विशाखापट्टणम आणि ओरिसाच्या किनारपट्टीच्या भागात धुमाकूळ घातला होता. या वादळातून लोकांना सोडवण्यासाठी 'ऑपरेशन लहर' ही मोहीम राबवण्यात आली होती.

## असा आहे हँडबॉल

**दो**स्तांनो, फुटबॉल, व्हॉलिबॉल हे खेळ तुम्हाला माहीत असतील. यासोबतच हँडबॉल नावाचा एक क्रीडाप्रकार आहे. जपानमध्ये नुकतीच महिलांची जागतिक हँडबॉल अजिंक्यपद स्पर्धा पार पडली. या निमित्ताने हँडबॉलविषयी जाणून घेऊ..

▶ हँडबॉल हा सांघिक खेळ आहे. हँडबॉलच्या एका संघात सात खेळाडू असतात. फुटबॉलमध्ये पायांनी बॉल मारायचा असतो. विरुद्ध संघाच्या गोलजाळ्यात बॉल गेल्यावर गोल होतो. हँडबॉलचंही तसंच आहे. यातही बॉल विरुद्ध संघाच्या गोलजाळ्यात टाकावा लागतो.

▶ हँडबॉलचचा एक सामना तासभराचा असतो. यात अर्ध्या तासाचे दोन हाफ असतात. हँडबॉल हा खूप वेगवान खेळ आहे. यात खेळाडू एकमेकांच्या अंगाला स्पर्श करू शकतात.

▶ हँडबॉल हा इनडोअर गेम आहे. पण हँडबॉलचे काही प्रकार मैदानात खेळले जातात. 'फील्ड हँडबॉल', 'चेक 'हँडबॉल', 'बीच हँडबॉल' हे आउटडोअर हँडबॉलचे काही प्रकार आहेत.

**फन टाईम**

▶ या खेळात पाय सोडून शरीराच्या कोणत्याही भागाने बॉलला स्पर्श करता येतो. फुटबॉलमध्ये बॉल डोक्याने मारता येतो. पण हँडबॉलमध्ये ही परवानगी नसते. गोलकीपर पायांनी बॉल अडवू शकतो. तसंच त्याला बॉल अडवण्यासाठी शरीराच्या कोणत्याही भागाचा वापर करता येतो.



## कांदा चिरताना...

मित्रांनो, कांदा चिरायला सुरुवात करताच आपल्या डोळ्यांतून पाणी येते. तुम्हीही हे अनुभवले असेल. कांदा चिरताना आई-बाबांचे डबडबलेले डोळेही पाहिले असतील. पण असे का होते, याचा कधी विचार केला आहे? चला, आज यामागील कारण पाहू या.

मुलांनो, कांद्याच्या थरांमध्ये खूप बारीक पेशी असून त्यामध्ये सल्फर संयुगे आणि एंजाइम असतात. सहसा हे दोन्ही वेगळे राहतात. परंतु सुरीने कांद्याच्या पेशी विलग होऊ लागतात ते घटक एकत्र येतात आणि या रासायनिक अभिक्रियेमुळे एक तीव्र वायू निर्माण होतो. त्याला लॅक्रिमॅटरी फॅक्टर म्हणतात. या वायूमुळे डोळ्यांची आग होते. पाणी येते.

आपले डोळे खूप संवेदनशील असतात आणि कोणत्याही प्रकारच्या हानिकारक रसायनापासून किंवा वायूपासून स्वतःचे संरक्षण करण्यासाठी ते लगेच प्रतिक्रिया देतात. म्हणूनच कांद्यातून उत्सर्जित होणारा वायू डोळ्यांच्या संपर्कात येतो तेव्हा डोळे त्याला धोकादायक पदार्थ मानतात आणि हा धोका टाळण्यासाठी डोळ्यांच्या अश्रू ग्रंथी लगेच अश्रू सोडू लागतात. अश्रूंचे काम हा वायू धुवून टाकण्याचे असते जेणेकरून डोळे सुरक्षित राहू शकतील.

**वाचा तर खरं**

शास्त्रज्ञांचा विश्वास आहे की ही कांद्यामधील एक नैसर्गिक संरक्षण यंत्रणा आहे. निसर्गानेच कांद्याला असे रसायन बनवण्याची क्षमता दिली आहे, जेणेकरून कोणताही कीटक किंवा प्राणी हानी पोहोचवू शकणार नाही. स्वाभाविकच अनेक प्राणी कांद्यापासून लांब राहतात. मात्र तुम्हाला कधी कांदा चिरण्याची वेळ आली आणि डोळ्यांची जळजळ टाळायची असेल तर एक काम करा. चिरण्यापूर्वी कांदा १०-१५ मिनिटे फ्रिजमध्ये ठेवा. थंड कांदे कमी गॅस सोडतात. दुसरे म्हणजे धारदार चाकू वापरा. यामुळे कांद्याच्या पेशी कमी तुटतील आणि कमी गॅस निर्माण होतो. कांदे कापताना जवळच पाण्याने भरलेले भांडे ठेवा किंवा कापण्यापूर्वी कांदा पाण्यात बुडवा. यामुळेही गॅस पाण्यात विरघळेल आणि डोळे जळजळणार नाहीत.



**ठिपके जुळवा**



## जमाना स्टार्ट अप्सचा

**दो**स्तांनो, तुम्ही स्टार्ट अप या संकल्पनेबद्दल ऐकलं असेल. अनेकजण स्वत:ची स्टार्ट अप सुरू करतात. स्टार्ट अप म्हणजे स्वत:ची कंपनी. कोणत्याही शाखेतली पदवी मिळवल्यानंतर स्टार्ट अप सुरू करता येईल. ही स्टार्ट अप्स वेगवेगळ्या क्षेत्रांमध्ये काम करतात. कमी भांडवल असलं तरी स्टार्ट अप्स सुरू करता येतात. कमी भांडवलात कोणती स्टार्ट अप्स सुरू करता येतील याविषयी माहिती असायला हवी. भविष्यात तुम्हीही या स्टार्टअप्सचा विचार करू शकता.

❶ छायाचित्रणाच्या क्षेत्रात अनेक संधी आहेत. इव्हेंट फोटोग्राफर म्हणून तुम्ही नाव कमवू शकता. फोटोग्राफीचा अभ्यासक्रम पूर्ण केल्यानंतर दर्जेदार कॅमेरा घेऊन करीअरला सुरुवात करता येईल. यासाठी फारशा भांडवलाची गरज नसते. पुरेसा अनुभव मिळाला की स्वत:ची फोटोग्राफी प्रशिक्षण संस्थाही सुरू करता येते.

**कोण होणार?**

❷ भारतात चारचाकी वाहनांची बाजारपेठ विस्तारते आहे. तुम्हीही गाड्यांच्या विक्रीचा व्यवसाय सुरू करू शकता. सेकंड हँड गाड्यांचीही विक्री करता येईल.

❸ देशभरात वाहनांच्या संख्येत प्रचंड वाढ होत आहे. त्यामुळे वाहन चालवण्याचे धडे देण्यासाठी प्रशिक्षकांची गरज असते. ड्रायव्हिंग स्कूलच्या माध्यमातून वाहन चालवण्याचं प्रशिक्षण दिलं जातं. हा व्यवसायही चांगला नफा मिळवून देतो.

❹ ब्युटी पार्लर किंवा स्पा क्षेत्राशी संबंधित अभ्यासक्रम पूर्ण करून स्वत:चं पार्लर किंवा स्पा सुरू करता येईल. या व्यवसायातही अनेक संधी आहेत.



## असं का?

### डास चावल्यानंतर का येते खाज?

मुलांनो,डास चावल्यानंतर तो भाग खाजू लागतो. अंगावर छोटासा फोडही येतो. असं का बरं होत असावं? माणसाच्या शरीरातून रक्त शोषण्यासाठी डास डंख मारतो. डासाचा डंख आपल्या शरीरात जातो. डासाने डंखआणि वारंवार मारल्यावर आपल्या शरीरातल्या रक्ताची गुठळी होते. रक्त शोषून घेताना डासाच्या शरीरात एका रसायनाची निर्मिती होते. हे रसायन माणसाच्या शरीरात गेल्यावर खाज सुटते. डास चावल्यानंतर माणसाच्या शरीराचा तो भाग संवेदनशील बनातो. सतत खाजवल्यामुळे त्या भागावर सूज येते. तसंच जंतूसंसर्गाचा धोकाही असतो. त्यामुळे डास चावल्यावर वारंवार खाजवणं टाळायला हवं.



### थंडीत का येतात मुंग्या?

मुलांनो, थंडीत हातापायांना सारख्या मुंग्या येतात. तापमान खूपच कमी झालं असेल तर हातापायांना मुंग्या येण्याचं प्रमाण वाढतं. सर्वसाधारणपणे आपले हात आणि पाय उघडे असतात. बाहेरच्या थंडीमुळे शरीराच्या उघड्या भागातलं रक्त गोठायला सुरुवात होते. गोठल्यामुळे रक्त वाहण्याची गती मंदावते. यामुळे हातापायांना मुंग्या येतात. याच कारणामुळे हातापायांची ताकदही कमी होते. थंड पाण्यात हात घातल्यानंतरही असं होतं.



## जगात कुत्र्यांची संख्या किती?

**छो**ट्या दोस्तांनो, सध्या तुम्ही भटके कुत्रे, कबुतरांना दाणा-पाणी घालण्यावरून सुरू असणारा वाद ऐकत असाल. पण मित्रांनो, ही केवळ आपल्या देशातील समस्या नाही. जगातील अनेक देशांमध्ये जास्त प्रमाणात कुत्रे आहेत. चला, जाणून घेऊ या कुत्र्यांची आकडेवारी...

**माहिती असावे**

कुत्र्यांची संख्या सर्वाधिक असणाऱ्या टॉप १० देशांच्या यादीत दहावा क्रमांक रोमानियाचा लागतो. इथे कुत्र्यांची संख्या सुमारे ४१ लाख आहे. १९८० च्या दशकात लोक गावांमधून शहरांमध्ये स्थलांतरित झाले, तेव्हा बरेच कुत्रे मागे राहिले आणि हळूहळू भटक्या कुत्र्यांची संख्या वाढली. एकेकाळी, संख्या नियंत्रित करण्यासाठी त्यांना मारले जात होते. परंतु प्राणी हक्क संघटनांच्या निषेधानंतर ती थांबवावी लागली. त्यामुळे येथे भटक्या कुत्र्यांची समस्या मोठी आहे.

* फ्रान्समध्ये सुमारे ७४ लाख कुत्रे आहेत. तेथे प्रत्येक पाळीव कुत्र्याला मायक्रोचिप बसवून लसीकरण करणे आवश्यक आहे. या कारणास्तव, रेबीजचे प्रमाण खूप कमी आहे. तथापि, दरवर्षी लाखो कुत्रे सोडून दिले जातात आणि भटक्या कुत्र्यांचे प्रमाण वाढते.
* या यादीत आठव्या स्थानी अर्जेंटिना असून तेथे सुमारे ९२ लाख कुत्रे आहेत. सरकार वेळोवेळी लसीकरण आणि नसबंदी मोहिमा राबवून त्यांची संख्या नियंत्रित करण्याचा प्रयत्न करत असले तरी यश आलेले दिसत नाही.
* यादीत सातव्या स्थानी फिलीपिन्स असून तेथे कुत्र्यांची संख्या १.१६ कोटी आहे. स्वाभाविकच रेबीजमुळे होणारे मृत्यू हा येथील चिंतेचा विषय होते. सरकार कुत्र्यांना मारण्याऐवजी लसीकरण आणि नसबंदीचा अवलंब करत आहे.
* जपान या यादीमध्ये सहाव्या स्थानी आहे. तेथे सुमारे १.२० कोटी कुत्रे आहेत. येथे बरेच लोक मुलांऐवजी पाळीव कुत्र्यांना कुटुंबाचा भाग मानतात. यामुळेच जपानचा पाळीव प्राणी उद्योग १० अब्ज डॉलर्सपेक्षा जास्त आहे.
* यादीमध्ये पाचव्या स्थानी असणाऱ्या रशियामध्ये सुमारे १.५० कोटी कुत्रे आहेत. येथे 'मेट्रो डॉग्स' म्हणून ओळखली जाणारी भटकी कुत्री तर ट्रेन आणि बसमध्ये प्रवास करायला शिकली आहेत. सरकार आणि सामान्य लोक एकत्रितपणे त्यांची काळजी घेतात.



* कुत्र्यांच्या संख्येबाबत भारत जगात चौथ्या क्रमांकावर असून आपल्याकडे सुमारे १.५३ कोटी भटके कुत्रे आहेत. अर्थातच हे देशापुढील मोठे आव्हान असून सरकारने पुढील वर्षभरात ७० टक्के कुत्र्यांचे लसीकरण आणि निर्जंतुकीकरण करण्याचे उद्दिष्ट ठेवले आहे.
* तिसऱ्या स्थानी असणाऱ्या चीनमध्ये २.७४ कोटी कुत्रे आहेत. पूर्वी तेथील काही शहरांमध्ये कुत्रे पाळण्यावर बंदी होती, परंतु आता लोकांनी कुत्रे पाळण्यास सुरुवात केली आहे. त्यामुळे चीनमधील पाळीव प्राणी बाजारपेठ देखील वेगाने वाढली आहे.
* यादीत दुसऱ्या स्थानी असणाऱ्या ब्राझीलमध्ये सुमारे ३.५७ कोटी कुत्रे आहेत. मात्र सरकारने लसीकरण आणि काळजी घेण्यासाठी चांगली व्यवस्था स्थापन केली आहे.
* जगभराचा विचार केला तर या यादीमध्ये अमेरिका अव्वल स्थानावर असून तेथे सुमारे ७.५८ कोटी कुत्रे आहेत. पाळीव प्राण्यांच्या काळजीसाठी तेथे विशेष डॉग पार्क, ग्रूमिंग सेंटर आहेतच खेरीज त्यांचे संरक्षण करणारे कडक कायदेही आहेत. प्राण्यांवरील क्रूरतेच्या प्रकरणांमध्ये इथे कठोर कारवाई केली जाते.



**चित्र रंगवा**

## अन्नाची नासाडी टाळण्यासाठी...

**मु**लांनो, सध्या लग्नाचा हंगाम आहे. लग्नप्रसंगी भरपूर प्रमाणात अन्न शिजवलं जातं. पार्ट्यांमध्येही विविध प्रकारचे खाद्यपदार्थ असतात. हे पदार्थ भरपूर प्रमाणात तयार केले जातात. लग्न, पार्ट्यांमधलं जेवणं उरतं. बरेचदा घरातलं जेवणही उरतं. आपण बाहेरचं खाल्ल्यावर घरी केलेले पदार्थ टाकून दिले जातात. पण अन्नाची नासाडी होता कामा नये. या जगात अनेकांना अन्न मिळत नाही आणि आपण अन्न वाया घालवतो. अन्न वाया घालवणं योग्य नाही. अन्नाची नासाडी टाळण्यासाठी काय करता येईल याविषयी...

- हॉटेलमध्ये गेल्यावर उगाचच भरपूर पदार्थ मागवून ठेवू नका. सुरूवातीला थोडंच मागवा. अजून लागलं तरच ऑर्डर द्या. भरपूर पदार्थ मागवल्यामुळे अन्न आणि पैसे दोन्हीही वाया जातात.
- घरात पार्टीचं आयोजन केल्यानंतर भरपूर अन्न उरलं तर ते टाकून देऊ नका. हे अन्न गरीबांना वाटा. बऱ्याच संस्था उरलेलं अन्न घरातून घेऊन जातात आणि गरीबांना वाटतात. अशा संस्थांचा शोध घ्या. लग्नसमारंभांमध्येही ही संकल्पना लढवता येईल.
- घरचं अन्न वाया घालवू नका. बाहेर खाणार असाल तर आईला तसं कळवा. घरी जेवण केलं असेल तर उगाचच बाहेर खाऊ नका.
- आपल्या मित्रमैत्रिणींनाही याबाबत सांगा. अशा संस्थांची माहिती द्या. अन्न वाया घालवणं किती चुकीचं आहे याची जागृती करून द्या.


**समाजभान**



### दोस्त हे मस्त

#### जग किटकांचं

फ्युनेल वेब स्पायडर हा जगातला सर्वात विषारी कोळी आहे. ड्रॅगनफ्लाय ही माशी सहा महिने जगते. डासांची लांबी जवळपास १६ मिलीलीटर इतकी असते. डास आपल्या वजनाच्या तीन पट अधिक रक्त शोषू शकतो. या पृथ्वीवरच्या एका फुलपाखराचं नाव ८९९८ आहे. कारण याच्या एका पंखावरची नक्षी ८९ या आकड्यासारखी तर दुसऱ्या पंखावरची नक्षी ९८ या आकड्यासारखी दिसते.



### खादाडी

#### पीनट बटर रॅप

संध्याकाळच्या वेळी पोटभरीचं काहीतरी खावंसं वाटतं. अशा वेळ पीनट बटर रॅप हा पदार्थ खाता येईल. यासाठी दोन चमचे पीनट बटर, एक चमचा चोको चिप्स, एक केळं, एक चमचा मध, पोळी किंवा पराठा असं साहित्य घ्या. केळ्याचे गोलाकार काप करून घ्या. पोळीवर पीनट बटर लावा. त्यावर केळ्याचे काप ठेवा. त्यावर चोको चिप्स पसरवा. त्यावर मध घाला. पोळीचा रोल करा. मस्तपैकी खा. डब्यातली पोळी उरली तर तिला अशा प्रकारे ट्विस्ट देता येईल.



### स्टडी टिप्स

#### अभ्यास गणिताचा

मुलांनो, तुम्हाला गणित हा विषय अवघड वाटतो का? गणिताची भीती वाटते का? गणिताची भीती वाटायचं काहीच कारण नाही. ही भीती घालवण्यासाठी विविध प्रयोग करता येतील. गणिताचा भरपूर सराव करायला हवा. गणितात बरीच सूत्रं असतात. गणिताची प्राथमिक सूत्र लक्षात ठेवली की तुम्हाला हा विषय सोपा जाईल. गणित हा विषय नीट समजून घेणं गरजेचं आहे.



### योगा टाईम

#### करा हलासन

मुलांनो, अभ्यास लक्षात ठेवावा लागतो. यासाठी स्मरणशक्ती चांगली असावी लागते. स्मरणशक्ती सुधारण्यासाठी वेगवेगळी आसनं करता येतील. यापैकी एक आसन म्हणजे हलासन. पण फक्त हे आसन करून भागणार नाही. तुम्ही पोषक आहार घेतला पाहिजे. हिरव्या भाज्या आणि फळं खाणं गरजेचं आहे. यामुळे तुमची स्मरणशक्ती सुधारेल आणि अभ्यास नीट लक्षात राहील.



# गणपती विसर्जनामुळे ईदची मिरवणूक पुढे



■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २९ :
गणपती विसर्जनामुळे मुस्लीम समाजाने मोहम्मद पैगंबर जयंतीची मिरवणूक ५ सप्टेंबरऐवजी ८ सप्टेंबरला करण्याचे ठरवले आहे. हे बघता राज्य सरकारने ५ ऐवजी ८ सप्टेंबरची शासकीय सुटी जाहीर करण्याची मागणी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पत्राद्वारे करण्यात आली आहे.

मुस्लीम समाजाचा पवित्र असा मोहम्मद पैगंबर साहेबांचा जन्मदिवस ५ सप्टेंबर रोजी आहे. तर ६ सप्टेंबर रोजी गणेश विसर्जन आहे. त्यामुळे ५ तारखेची मोहम्मद पैगंबर जयंतीची मिरवणूक ८ सप्टेंबर रोजी घेण्याचा निर्णय मुस्लीम समाजाने घेतलेला आहे, याची नोंद घेऊन ५ सप्टेंबर रोजी जाहीर केलेली शासकीय सुट्टी ८ सप्टेंबर रोजी द्यावी, अशी मागणी मुख्यमंत्र्याकडे करण्यात आली आहे.

भारतात विविध धर्माच्या उत्सव, सण मोठ्या धुमधडाक्यात साजरे केले जातात. भारतीय संविधानाने सरकारचा कोणताही धर्म नसेल, भारत हा धर्मनिरपेक्ष राष्ट्र असेल असे स्पष्ट नमूद केले आहे.

परंतु प्रत्येकाला त्याचा-त्याचा धर्म आणि परंपरा पाळण्याचे संपूर्ण स्वातंत्र्य दिले आहे. त्यानुसार या देशात पूवापार चालत असलेले सण, उत्सव मोठा उत्साहात साजर केले जातात. अनेक सणांना राज्य आणि केंद्र सरकार सुटी देखील जाहीर करत असते.

सध्या महाराष्ट्रात गणेशोत्सवाची धूम सुरू आहे. त्यापूर्वी गौरी आणि आता गणपती आणि दुर्गा उत्सव असे हिंदू धर्माचे सण साजरे होतात. त्यासाठी सरकार सुटी देखील जाहीर करत असते.

ई-ए-मिलादला देखील सुटी जाहीर करण्यात आली आहे. परंतु मुस्लीम समाजाचा पवित्र असा मोहम्मद पैगंबर साहेबांचा जन्मदिवस ५ सप्टेंबर रोजी आहे. तर ६ सप्टेंबर रोजी गणेश विसर्जन आहे, त्यामुळे ५ तारखेची मोहम्मद पैगंबर जयंतीची मिरवणूक ८ सप्टेंबर रोजी घेण्याचा निर्णय मुस्लीम समाजाने घेतलेला आहे, याची नोंद घेऊन ५ सप्टेंबर रोजी जाहीर केलेली शासकीय सुट्टी ८ सप्टेंबर रोजी द्यावी, अशी मागणी काँग्रेस नेते व माजी मंत्री नसीम खान केली आहे.

राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पाठवलेल्या पत्रात नसीम खान म्हणतात की, राज्यात बंधुभाव व हिंदू मुस्लीम एकोपा अबाधित राखण्यासाठी मुंबईत विविध मुस्लीम संघटनांनी गुरुवार दिनांक २१ ऑगस्ट रोजी ऑल इंडिया खिलापत कमिटीमध्ये बैठक घेतली. मोहम्मद पैगंबर यांच्या जन्मदिनी मुंबईत काढण्यात येणारी मिरवणूक ही सोमवार दिनांक ८ सप्टेंबर रोजी काढण्याचा निर्णय यावेळी घेण्यात आला आहे, जेणेकरून दोन्ही धमार्चे पवित्र सण हे प्रेम व सद्भावनेने साजरा करता येतील, असे नसीम खान यांनी म्हटले आहे.

## मराठा समाजाला न्याय पण....
# ओबीसीवर अन्याय नको!



■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २९ :
मराठा समाजाने देवेंद्र फडणवीस यांचे सरकार यावे म्हणून भाजपला भरभरुन मतदान केले आहे. राज्यातील मराठा समाज वेगळी भूमिका घेत नाही. ओबीसी समाजाने सुद्धा आम्हाला मोठ्या प्रमाणात मतदान केले आहे. आम्ही सर्व समाजासोबत आहोत, पण म्हणून यांच्या ताटातील काढून दुसऱ्यांच्या ताटात टाकायचे, आणि त्यांचे काढून यांच्या ताटात टाकायचे ही भूमिका मात्र कुणाला मान्य नाही, असे भाजपचे मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी म्हटले आहे.

बावनकुळे म्हणाले की, आमची आंदोलनासाठी नेहमी सहकार्याची भूमिका आहे. आमचे अनेक आमदार-खासदार मंत्री त्यांना भेटतात. देवेंद्र फडणवीस यांनी कधीही आंदोलनकर्त्यांना दुरावले नाही. नियमात बसणारी प्रत्येक मागणी पूर्ण करण्याचे काम फडणवीस यांनी काम केले आहे. ५० वर्षांत जे काम झाले नाही ते देवेंद्र फडणवीस यांनी ९ वर्षात मराठा समाजासाठी काम केले आहे.

### ईडब्ल्यूएसला सर्वाधिक फायदा

चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले की, ओबीसी मधून आरक्षण मागण्या करता संपूर्ण देशामध्ये वेगवेगळी आंदोलन सुरू होती. पण ईडब्ल्यूएस आरक्षणाचा निर्णय झाल्यानंतर मात्र १० टक्के ओबीसीच्या बाहेर असलेले ज्यांना या आरक्षणाचा लाभ मिळाला त्यांना आज नोकऱ्या आणि शिक्षणामध्ये सर्वाधिक फायदा मिळत आहे. मराठा समाजाला न्याय देण्यासाठी एहर

बावनकुळे म्हणाले की, देवेंद्र फडणवीस सरकारने १० टक्के ईडब्ल्यूएस आरक्षण आणि सारथी सारख्या योजनांच्या माध्यमातून मराठा समाजाला प्रचंड मजबूती देण्याचे काम महाराष्ट्रामध्ये होत आहे. ईडब्ल्यूएसचा सर्वाधिक फायदा देशात केवळ महाराष्ट्राला झाला आहे. मराठा समाजाला न्याय देणं आणि ओबीसी समाजाचे १ टक्काही आरक्षण जाऊ नये ही भूमिका भाजपची राहिली आहे.यासोबतच मराठा समाजाला न्याय दिला पाहिजे या भूमिकेतून एहर आरक्षण पुढे आले आहे.

### शरद पवारांची भूमिका कळावी

बावनकुळे म्हणाले की, काँग्रेस ही नेहमीच ओबीसी समाजाच्या विरोधात राहिली आहे. काँग्रेसने कधीही ओबीसी समाजाला न्याय दिला नाही. नरेंद्र मोदी पंतप्रधान झाल्यावर ओबीसीच्या आयोगाला संवैधानिक दर्जा मिळाला.

महाराष्ट्रामध्ये ओबीसी मंत्रालय हे देवेंद्र फडणवीस यांच्या काळात आले आहे. असे असताना खुला पाठिंबा जर काँग्रेस आंदोलनाला देत आहे. ओबीसीतूनच आरक्षण द्या यातील ३५३ जातींनाच आरक्षण कमी आहे. त्यातून जर मराठा समाजाला आरक्षण दिले तर ओबीसींवर अन्याय होऊ नये, अन् मराठा समाजावर अन्याय होऊ नये ही आमची भूमिका आहे. शरद पवार यांची भूमिका काय आहे हे सर्वांना कळायला पाहिजे.

### सरसकट ह्या शब्दाला आमचा विरोध

बावनकुळे म्हणाले की, भाजप हा पक्ष सर्व समाजाच्या मागे उभे राहिली आहे. काँग्रेस पक्ष आपली भूमिका स्पष्ट करत नाही. त्यांनी या आंदोलनाला आपला पाठिंबा म्हणजे नेमके काय हे भूमिका काँग्रेसच्या नेत्यांनी स्पष्ट केली पाहिजे.

एकनाथ शिंदे हे मुख्यमंत्री असताना सर्वेक्षण करण्यात आले ज्यांच्याकडे नोंदी सापडल्या त्यांना ओबीसीमध्ये घेतल्या गेले. अजूनही सर्वेक्षण सुरू आहे. अजून ज्यांना न्याय मिळाला नसेल त्यांना न्याय मिळेल. सरसकट ह्या शब्दाला आमचा विरोध आहे तसे होऊच शकत नाही, असेही बावनकुळे यांनी स्पष्ट केले.

### काँग्रेसची भूमिका स्पष्ट करावी

बावनकुळे म्हणाले की, मराठा समाजाला ओबीसीतून आरक्षण द्या या मागणीवर काँग्रेसची भूमिका काय आहे? हे पटोले, वडेट्टीवार, राहुल गांधी या नेत्यांनी स्पष्ट केले नाही. मराठा समाजाला ईडब्लूएसचे १० टक्के आरक्षण आणि अजून काही देण्याचा प्रयत्न सरकारकडून सुरु आहे. पण एका समाजाला न्याय देताना दुसऱ्या समाजावर अन्याय होऊ नये ही सरकारची भूमिका आहे. फडणवीस सरकारने सारथी सारख्या अनेक गोष्टी केल्या आहेत. पुढच्या काळातही मराठा समाजाला मजबूत करण्यासाठी आमचे सरकार प्रयत्नशील राहील.

# व्हिडीओ टाकला म्हणून कारवाईचा बडगा?

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. २९ :
मुसळधार पावसात शिवशाही बस गळत असल्याने भिजत असलेल्या चालकाला महिला वाहकाने छत्रीचा आधार घेत ओले होण्यापासून वाचविले. शिवशाहीमधील महिला वाहक चालकाच्या डोक्यावर छत्री घेऊन त्याच्या मागे उभी राहिली. याचा व्हिडीओ एसटी कर्मचाऱ्यांच्या व्हाट्सॲप ग्रुपवर टाकल्याने एसटीच्या अधिकाऱ्यांनी महिला वाहकाला धारेवर धरत स्पष्टीकरण मागितले असून, निलंबीत करण्याची धमकी दिली आहे.

घटना अशी की, भंडारा आगाराची वातानुकूलित शिवशाही बस गोंदियाच्या दिशेने जाण्यासाठी निघाली. मात्र, मुसळधार पावसाने शिवशाहीला गळती लागली. बसच्या वरच्या टपातून पाण्याची धार लागली होती. परिणामी, ओले होत असलेल्या चालकाला बस चालविण्यास अडचण येत होती. हा प्रकार लक्षात येताच महिला वाहकाने चालकाच्या डोक्यावर चक्क छत्री धरून त्याचे संरक्षण केले. या गळतीचा फटका शिवशाही मधील प्रवाशांनाही बसला.

अर्थात, बस चालकाच्या मागे महिला वाहक छत्री धरून उभी असल्याचे बसमधील प्रवाशांनाही कुतूहल वाटले. अनेकांनी हे दृश्य आपल्या मोबाईलमध्ये टिपले तर काहींनी याच व्हिडीओ देखील तयार केला. हाच व्हिडीओ नंतर एसटी कर्मचाऱ्यांच्या व्हाट्सॲप ग्रुपवर टाकण्यात आला.



खरेतर, या विडीओनंतर एसटी बसची दुरूस्ती करण्याची आवश्यकता होती. परंतु, एसटीचे विशेषतः शिवशाहीचे खरे रूप उघड झाल्याने अधिकाऱ्यांनी महिला वाहकाला धारेवर धरले आणि स्पष्टीकरण मागत निलंबीत करण्याची धमकी दिली. कर्तव्यावरून परतल्यानंतर महिला वाहकाने कारवाईचा धसका घेतल्याने त्यांना भोवळ आली आणि त्या एसटी आगाराच्या कार्यालयात कोसळल्या. नंतर त्यांना उपचारासाठी जिल्हा सामान्य रुग्णालयात दाखल करण्यात आल्याची माहिती आहे.

## बारा जणांचा सशस्त्र हल्ला युवक ठार, गावात तणाव

■ महासागर प्रतिनिधी
बुलढाणा, दि. २९ :
क्षुल्लक कारणावरून बारा इसमानी एका कुटूंबात घरात शिरून सशस्त्र हल्ला केला. या भीषण हल्ल्यात एका युवक जागीच ठार झाला आहे. निवाना (तालुका संग्रामपूर ) या गावात ही घटना घडली. शुक्रवारी सर्व १२ आरोपीना पोलिसांनी अटक केली.

हत्येचे पडसाद उमटू नये आणि दोन गटात संघर्ष होऊ नये म्हणून निवाना गावात काल मध्यरात्री पासूनच तगडा पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे.

वैभव सोळंके, अमोल सोळंके, सुरज सोळंके, आकाश सोळंके, ईश्वर सोळंके, मानसिंग सोळंके, राजेश सोळंके, अजय पवार, दत्ता पवार, महेश सोळंके अशी आरोपीची नावे आहे. सर्व आरोपी निवाणा, ता. संग्रामपूर येथील रहिवासी आहेत. या बारा जणांनी केलेल्या सशत्र हल्ल्यात ऋषीकेश सुभाष मोहे (वय २७), रा. निवाणा असे ठार झालेल्या युवकाचे नाव आहे. आरोपीनी हत्यारनिशी ऋषिकेश मोहे याच्या घरात घुसून मारहाण केली.

# मनपाच्या दोन कंत्राटदारांचा काळ्या यादीत समावेश

## फाईल चोरण्याच्या आरोपावरून कारवाई

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. २९ :
नागपूर महानगरपालिकेच्या लक्ष्मीनगर झोन कार्यालयातील उपअभियंता कार्यालयातून महानगरपालिकेच्या फाईल चोरण्याच्या आरोपावरून नागपूर महानगरपालिकेने दोन कंत्राटदारांवर कारवाई केली आहे. त्यांचे नोंदणी प्रमाणपत्र रद्द करून त्यांना कायमस्वरुपी काळ्या यादीत टाकले आहे. अनिकेत रंगारी व राजेश रंगारी अशी या दोन कंत्राटदारांची नावे आहेत.

२५ जुलै रोजी मनपाच्या लक्ष्मीनगर झोनमधील उपअभियंता अभिजीत नेताम यांच्या कार्यालयातून कंत्राटदार अनिकेत रंगारी व राजेश रंगारी यांनी कार्यालयीन नस्त्यांची चोरी केली. या संदर्भात उपअभियंता अभिजीत नेताम यांनी बजाजनगर पोलीस ठाण्यात तक्रार नोंदविली आहे. त्यानुसार या दोन्ही कंत्राटदारांवर बजाजनगर पोलीस ठाण्यात गुन्हे दाखल झालेले आहेत.

अनिकेत रंगारी व राजेश रंगारी या दोन्ही कंत्राटदारांच्या कृतीची गांभीयार्ने दाखल घेत नागपूर महानगरपालिकेचे आयुक्त तथा प्रशासक डॉ. अभिजीत चौधरी यांच्या २१ ऑगस्ट २०२५ च्या आदेशान्वये या दोन्ही कंत्राटदारांचे नोंदणी प्रमाणपत्र रद्द करण्यात आले आहे. त्याचप्रमाणे नागपूर महानगरपालिकेच्या सर्व प्रकारच्या निविदा प्रक्रियेत सहभागी घेण्यापासून कायमस्वरुपी प्रतिबंधित करून या दोन्ही कंत्राटदारांना काळ्या यादीत टाकण्यात आल्याचे कार्यकारी अभियंता (प्रकल्प १) यांनी आदेशात म्हटले आहे.

: साप्ताहिक संवाद :
## बालकुमार साहित्य संस्थेचे भरीव उपक्रम




लोकरंग

वाचाल तर वाचाल असं आपण नेहमी म्हणतो. परंतु वाचनाची सुरवात हि बालवयापासूनच व्हायला हवी. अर्थात आपल्याकडे अनेक मोठ्या साहित्यिकांनी खास मुलांसाठी विपुल प्रमाणात लेखन देखील केलेले आहे.

खास मुलांसाठी साहित्य संपदा निर्माण करून वाचनाची आवड वृध्दीनग्त करणाऱ्या अनेक संस्थांपैकी बालकुमार साहित्य संस्था सक्रिय संस्था आहे.

संस्थेचा सुवर्णमहोत्सव पूर्ण झाला असून या महिन्यात संस्था एकाव्वन व्या वर्षात पदार्पण करीत आहे. या निमित्ताने बालकुमार साहित्य संस्थेचे अध्यक्ष माधव राजगुरू यांच्याशी आजचा साप्ताहिक संवाद.

बालकुमार साहित्य संस्थेने नुकताच सुवर्णमहोत्सव साजरा केला आहे हा प्रवास कसा होता?

■ १९ व्या शतकाच्या उत्तरार्धात १८७८ मध्ये पुण्यात न्यायमूर्ती रानडे यांच्या अध्यक्षतेखाली पहिले मराठी ग्रंथकार संमेलन भरले तर १९७६ मध्ये भा रा भागवत यांच्या अध्यक्षतेखाली पहिले अखिल भारतीय मराठी बालकुमार साहित्य संमेलन भरले.

या अगोदर १९७५ यामध्ये मराठी साहित्य, संस्कृती, कला क्षेत्रात बालकुमार साहित्यामध्ये योगदान देण्यासाठी अखिल भारतीय बालकुमार साहित्य संस्थेची स्थापना झाली.

मराठी साहित्य संमेलनात बालकुमार साहित्याला दुय्यम वागणूक मिळायची यामुळेच अमरेंद्र गाडगीळ,भा रा भागवत, शामला शिरोडकर, रमेश मुधोळकर अशा मंडळींनी या साहित्य संस्थेची स्थापना पुण्यात केली. १९७६ ते २०२४ या काळात संस्थेने बालकुमार संहितायची सुमारे २७ संमेलने घेतलेली आहेत.

शिवाय राज्यस्तरीय बाळ साहित्य पुरस्कार, जीवन गौरव पुरस्कार, मुलांमध्ये मराठी भाषेची आवड निर्माण करण्यासाठी कथा कविता वाचन आणि लेखन स्पर्धा,अशा प्रकारे आजवरच्या प्रवासात संस्थेने बालकुमारांच्या साहित्याचे संस्कृतीचे जतन आणि संवर्धन करण्याचा प्रयत्न केलेला आहे.

संस्थेच्या एकूण किती शाखा आहेत?आणि त्याद्वारे कोणते उपक्रम राबविले जातात?

■ संपूर्ण महाराष्ट्र राज्यात संस्थेच्या एकूण २५ शाखा आहेत. शिरूर पुणे, संगमनेर, आजरा, राजापूर, संभाजीनगर, चिपळूण, अमरावती, कणकवली, बीड, पालघर,जालना अशा एकूण २५ शाखा कार्यरत आहेत. याशिवाय भविष्य काळात गुजरात, कर्नाटक, छत्तीसगढ, मध्य प्रदेश या राज्यांमधील मराठी वाचकांचे प्रेम आणि मागणी लक्षात घेता तिथेही शाखांचा विस्तार होणार आहे.

शासन स्तरावर बालसाहित्याला केवळ ६ पुरस्कार देण्यात येतात. मात्र मराठी बालकुमार साहित्य संस्थेच्या माध्यमातून १९ बालकुमार साहित्याला पुरस्कार दिले जातात. शिवाय बालकांसाठी साहित्य वाचन,लेखन स्पर्धांचे आयओजन,तसेच वक्तृत्व स्पर्धा आणि विविध कलाप्रकारासाठी देखील स्पर्धांचे आयोजन केले जाते.

भविष्य काळात संस्थेच्या मध्यमातून कोणते उपक्रम राबविले जाणार आहेत?

■ बालकुमार साहित्य संस्थेने आता पन्नाशी पूर्ण करून एक्कावन्न व्या वर्षात यशश्वी पदार्पण केले आहे. भविष्य काळात संस्था अनेक नवीन उपक्रम राबविणार आहे. यामध्ये बालसाहित्यिक कोष, मुलांसाठी ज्ञानकोश, उत्तम बालसाहित्य निर्मितीसाठी मुले आणि नवोदित बालसाहित्यिकांसाठी कार्यशाळा, शालेय मुलांचे कवी संमेलन, वाचन, लेखन आणि भित्तिपत्र स्पर्धा अशा स्पर्धांचे आयोजन देखील संस्था मोठ्या प्रमाणात करणार आहे.

सुवर्णमहोत्सवी समरणिका आणि बालसाहित्य मासिक देखील सुरु केले जाणार आहे. मुलांसाठी आणि बालसाहित्यासाठी काम करणाऱ्या अनेक संस्थांना एकत्र जोडून भरीव असे कार्य करण्याचा संस्थेचा मानस आहे. ■ ■ ■

केरळ हे जगातील सर्वात लोकप्रिय पर्यटन स्थळांपैकी एक आहे, जे नयनरम्य सौंदर्य, हिल स्टेशन्स, बॅकवॉटर आणि पाककृतीसाठी प्रसिद्ध आहे. समतोल हवामान, निर्मळ समुद्रकिनारे, शांत बॅकवॉटर, हिरवीगार हिल स्टेशन्स, आयुर्वेदिक उपचार केंद्रे आणि वन्यजीव यामुळे ते एक लोकप्रिय पर्यटन स्थळ बनले आहे.थेक्कडी हे वन्यजीव आणि निसर्ग प्रेमींसाठी स्वर्ग आहे आणि केरळमधील थंड हवामान, हिरवळ, वन्यजीव अभयारण्य आणि चहा, कॉफी आणि सुगंधी मसाल्यांच्या लागवडीसह टेकड्यांमुळे केरळमधील सर्वोत्तम ठिकाणांपैकी एक आहे.

पेरियार वन्यजीव अभयारण्य ७७७ चौ.कि.मी.मध्ये पसरलेले आहे आणि थेक्कडी मधील हे एक आवश्यक ठिकाण आहे. ७७७ चौरस किलोमीटरपैकी ३६० चौरस किलोमीटर घनदाट सदाहरित जंगल आहे. पेरियार वन हे एक राखीव वन्यजीव आहे जेथे बोटीच्या सुरक्षिततेतून वन्यजीवांचे निरीक्षण करता येते. तलावात खेळणारे हत्ती आणि आजूबाजूला घुटमळणारे वाघ हे पाहण्यासारखे दृश्य आहे. हत्तींव्यतिरिक्त, सिंहाच्या शेपटीचे मकाक, सांबर हरण, बिबट्या आणि रानडुक्कर देखील दिसतात. पंबा आणि पेरियार नद्या घनदाट उद्यानातून वाहतात आणि वनस्पती आणि जीवजंतूंच्या वाढीस मदत करतात. मलबार ग्रे हॉर्नबिल, पांढऱ्या पोटाचा निळा फ्लायकॅचर, सनबर्ड, ग्रेट हॉर्नबिल, काळ्या मानेचा करकोचा आणि निलगिरी वुड कबूतर यांसारख्या अनेक स्थलांतरित पक्ष्यांनाही ते आश्रय देते. ट्री हाऊस रिसॉर्टमध्ये राहून तुम्ही वन्यजीव आणि हिरवाईचा आनंद घेऊ शकता. ■ ■ ■

## निसर्गरम्य केरळची सफर



: संकलन व संयोजन :
सुबोध रणशेवरे, ९८३३१४६३५६
subodh.ranshevre @rediffmail.com

## नेक्स्ट्राचा सस्टेनेबिलिटी अहवाल प्रसिद्ध




नेक्स्ट्रा डेटा लिमिटेड (नेक्स्ट्रा बाय एयरटेल) ने वित्त वर्ष २०२४-२५ चा सस्टेनेबिलिटी अहवाल प्रसिद्ध केला. या अहवालामध्ये कंपनीनं स्मार्ट, मोठ्या प्रमाणात वापरता येईल अशी आणि टिकाऊ डिजिटल इन्फ्रास्ट्रक्चर तयार करण्याबाबत झालेली प्रगती सांगितली.

हा अहवाल शाश्वतेच्या तीन स्तंभांमध्ये नेक्स्ट्राची वचनबद्धता आणि प्रगती अधोरेखित करतो स्वच्छ ऊर्जा आणि स्मार्ट ऑपरेशन्सद्वारे पर्यावरणीय प्रभाव कमी करणे, सामाजिक समावेश आणि सुरक्षितता वाढवणे आणि पारदर्शकता आणि जबाबदारीसह प्रशासनाला बळकटी देणे.

सीईओ, ॲशिष अरोरा यांनी सांगितले, नेक्स्ट्रा मध्ये सस्टेनेबिलिटी हा आमच्या प्रत्येक कामाचा केंद्रबिंदू आहे. मग तो डिझाईन असो, कन्स्ट्रक्शन असो किंवा ऑपरेशन्स. या वर्षी आम्ही इंडस्ट्रीसाठी नवे बेंचमार्क तयार केले आहेत.

आम्ही देशातले पहिले डेटा सेंटर आणि फक्त १४ वी कंपनी आहोत ज्यांनी आरई १०० जागतिक उपक्रमात प्रवेश केला आणि १००% पुनर्नवीनीकरणीय उर्जेचा वापर करण्याची वचनबद्धता दिली. तसेच आम्ही देशातले पहिले आहोत ज्यांनी अकचा मोठ्या प्रमाणावर वापर करून उर्जा कार्यक्षमता वाढवली आणि कार्यप्रदर्शन सुधारले.

कंपनीने तब्बल ४८२८०० मेगावॅट पुनर्नवीनीकरणीय ऊर्जा कराराद्वारे घेतली असून २०२१ च्या आधारभूत वर्षाच्या तुलनेत ३७ टक्के जास्त आहे. ८५/१०० चे कर्मचारी प्रतिबद्धता गुण मिळवून कामाच्या ठिकाणी विश्वास वाढवला असून ९९ % पुरवठादार भारतातलेच ठेवले. त्यामुळे स्थानिक अर्थव्यवस्था मजबूत केली आणि लवचिक पुरवठा साखळी वाढवली.

धोरणात्मक पुरवठादारांच्या ९८% साठी ईएसजी मूल्यांकन आयोजित करून संपूर्ण मूल्य साखळीमध्ये शाश्वतता सुनिश्चित केला आहे. ■ ■

# दोन दुचाकी धडकल्या ३ ठार, ३ जखमी

■ महासागर प्रतिनिधी, बुलढाणा, दि. २९ :
जिल्ह्यातील संग्रामपूर तालुक्यात झालेल्या भीषण अपघातात तिघांचा मृत्यू झाला तर तिघेजण गंभीर जखमी झाले आहे. यापैकी दोघांचा घटनास्थळीच तर एका व्यक्तीचा उपचारासाठी नेत असताना वाटेतच मृत्यू झाला.मृतका मध्ये २ पुरुष व १ महिलेचा समावेश आहे तर तिघे जण गंभीर जखमी झाले असून त्यांच्यावर उपचार सुरु आहे.

संग्रामपूर तालुक्यातील एकलारा वरवट मार्गावर दोन दुचाकीची धडक होऊन हा भीषण अपघात झाला. गुरुवारी रात्री उशिरा ही दुर्घटना घडली. वरवट बकाल येथुन दुचाकीने दोघेजण बावनबीर कडे जातं होते. पाळोदी येथील रहिवासी दुचाकीने टूनकी येथे एका नातेवाईक महिलेच्या अंत्यसंस्कार विधीला उपस्थित राहून नंतर पाळोदी (जिल्हा अकोला) कडे जातं होत होते. दरम्यान एकलारा वरवट रसत्यावर भरवेगात जाणाऱ्या या दोन दुचाकीची आमनेसामने धडक झाली.

अजय लहासे, गणेश ढोले, रुख्माबाइ विष्णु नवले अशी अपघातात मृत्यूमुखी पडलेल्या दुर्दैवी व्यक्तींची नावे आहे. या अपघातात शिवा घुले, राहुल जवंजाळ, महादेव नांदोकार, हे तिघेजण गंभीर जखमी झाले. शिवा घुले याची प्रकृती गंभीर असल्याने त्याला अकोला येथे दाखल करण्यात आल्याचे पोलीस सूत्रांनी सांगितले.

## विद्याधर बोरटकर यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार



■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. २९ :
ॲग्रोव्हिजन फाऊंडेशनचे अध्यक्ष रविंद्र बोरटकर तसेच प्रॉफिट ॲडव्हर्टायझर्सचे प्रमुख नरेंद्र बोरटकर यांचे वडील विद्याधर (नानासाहेब) केशवराव बोरटकर यांच्या पार्थिवावर गुरूवार २८ ऑगस्ट रोजी अंबाझरी घाटावर अंत्यसंस्कार करण्यात आले.

विद्याधर बोरटकर यांचे बुधवार २७ ऑगस्ट रोजी अल्पशा आजाराने निधन झाले. मृत्यूसमयी ते ९२ वर्षाचे होते. धरमपेठ शाळेतून शिक्षक पदावरून ते निवृत्त झाले होते. १२७, दीनदयाळ नगर येथील राहत्या घरून त्यांची अंत्ययात्रा काढण्यात आली. अंबाझरी घाटावर आयोजित शोकसभेत अनेक मान्यवरांनी शोकसंवेदना व्यक्त केल्या. त्यांच्या पश्चात रविंद्र व नरेंद्र ही दोन मुले, सुषमा दिवाकर गोखले व हेमा रमाकांत डांगे या मुली तसेच कुमकुम व मनीषा या सुना आणि मोठा आप्त परिवार आहे.

## जि. प. कर्मचारी महासंघाचे नेते म. वा. ओंकार यांचे निधन



■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. २९ :
जिल्हा परिषद कर्मचारी महासंघाचे नेते म. वा.ओंकार यांचे नागपूर येथे निधन झाले. मृत्यू समयी ते ९५ वर्षाचे होते.

मूळचे राळेगाव (जि. यवतमाळ) असलेले मधुकर वामनराव ओंकार हे कर्मचाऱ्यांमध्ये म. वा.याच नावाने ओळखले जायचे. राज्य कर्मचारी महासंघाचे र. ग. कर्णिक आणि जिल्हा परिषद कर्मचाऱ्यांच्या संघटनेचे नेते असलेले म. वा. यांनी कर्मचाऱ्यांच्या राज्यव्यापी संपाचे यशस्वी नेतृत्व करून प्रत्येक वेळी राज्य शासनाच्या नाकात दम आणला होता. त्यांच्या नेतृत्वाखाली झालेल्या संपात बहुतेक वेळा त्यांनी शासनाकडून कर्मचाऱ्यांच्या मागण्या मान्य करून घेण्यात बऱ्यापैकी यश मिळविले आहे.

त्यांच्या पश्चात मोठा आप्तपरिवार आहे. त्यांच्या पार्थिवावर शुक्रवारी नागपूर येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. याप्रसंगी आयोजित शोकसभेत जि. प. कर्मचारी संघटना आणि महासंघाच्या अनेक नेत्यांनी शोकसंवेदना प्रकट केल्या.

# विमानसेवा १ सप्टेंबरपासून पूर्ववत होणार?

■ महासागर प्रतिनिधी, अमरावती, दि. २९ :
गेल्या आठ दिवसांपासून बंद असलेली अलायन्स एअरची मुंबई-अमरावती-मुंबई विमानसेवा येत्या १ सप्टेंबरपासून पूर्ववत होण्याची चिन्हे आहेत. गेल्या २२ ऑगस्टपासून ही सेवा बंद होती. चार विमान उड्डाणे रद्द करण्यासंदर्भात अलायन्स एअर कंपनीने विमानतळ व्यवस्थापनाला कळवले होते. विमानतळाच्या लोकार्पणापासून आतापर्यंत अनेकवेळा अचानकपणे विमान उड्डाणे रद्द झाल्याने प्रवाशांमध्ये नाराजीचा सूर आहे.




१६ एप्रिल २०२५ रोजी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते अमरावती विमानतळाचे लोकार्पण करण्यात आले आणि गेल्या अनेक वर्षांची अमरावतीकरांची प्रतीक्षा पूर्ण झाली. आठवड्यातून तीन दिवस मुंबई-अमरावती-मुंबई ही विमानसेवा सुरू झाली. दर सोमवारी, बुधवारी आणि शुक्रवारी ७२ आसनी विमान मुंबईच्या दिशेने आकाशात झेपावते.

पण, गेल्या चार महिन्यात अनेक वेळा विमान उड्डाण रद्द करण्यात आले आहे. काही दिवसांपुर्वी प्रतिकूल हवामानामुळे विमान उड्डाणे रद्द करण्यात आली. २२, २५, २७ आणि २९ ऑगस्ट रोजी विमानसेवा बंद राहील, अशी माहिती अलायन्स एअर कंपनीने विमानतळ व्यवस्थापनाला दिली होती. उड्डाणे रद्द करण्यामागे ऑपरेशनल समस्या कारणीभूत असल्याचे सांगण्यात आले आहे.

अलायन्स एअरच्या संकेतस्थळावर १ सप्टेंबर पासून विमानसेवा सुरू राहील, असे स्पष्ट करण्यात आले आहे. २९ ऑगस्टला सकाळपर्यंत या तारखेच्या ३ हजार १५० रुपये किमतीच्या दोन जागा शिल्लक असल्याचे दिसून आले.

अमरावतीत-मुंबई विमानसेवेला गेल्या चार महिन्यांमध्ये चांगला प्रतिसाद मिळत आहे. सरासरी ५० ते ६० प्रवासी या विमानसेवेचा लाभ घेत असल्याचे दिसून आले आहे. तरीही विमान कंपनी ही दीव आणि हैदराबाद विमानसेवेला प्राधान्य देत असल्याचे प्रवाशांचे म्हणणे आहे.

अलायन्स एअरची फ्लाइट प्रथम मुंबईहून दीव किंवा हैदराबादला जाते आणि नंतर दुपारी ती मुंबईला परत येते आणि अमरावतीला जाते. त्यानंतर, अमरावतीला पोहोचल्यानंतर, तिला परत मुंबईला यावे लागते. अशा परिस्थितीत, हवामान किंवा इतर कोणत्याही तांत्रिक कारणामुळे उड्डाणाला उशीर झाल्यास, अमरावतीमध्ये रात्रीच्या लँडिंगची सुविधा नसल्याने त्या दिवसाची फ्लाइट रद्द केली जाते. हे यापूर्वीही अनेकदा घडले आहे.

विमानसेवेबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींकडून कोणताही प्रतिसाद मिळत नसल्याने प्रवासी संताप व्यक्त करत आहेत. अमरावती-मुंबई विमानसेवा सुरळीत ठेवण्यासाठी स्थानिक लोकप्रतिनिधींकडून प्रयत्न करावेत. ही सेवा बंद पडू नये, याची खबरदारी घ्यायला हवी, अशी प्रवाशांची अपेक्षा आहे.